cmyk

## संपादकीय

### छप्पर फाड निर्णय!

सरकार मग ते कुणाचेही असो निवडणुका तोंडावर आल्या की, प्रचंड कार्यतत्पर होते! सत्ताधा-यांना जनतेचा प्रचंड कळवळा येतो आणि मग सरकार 'जो जे वांछिल तो ते लाहो..' असे पसायदान आळवत जनतेच्या सुखासाठी, समृद्धीसाठी, विकासासाठी, स्वप्नपूर्तीसाठी असे झपाटल्यागत कामाला लागते की, काही विचारता सोय नाही. सरकारच्या या झपाटलेपणासमोर राज्याची तिजोरी, तिची स्थिती, तिचे स्वास्थ्य, निरंतर व शाश्वत विकासाचा मार्ग वगैरे वगैरे सगळे मुद्दे निरर्थकच ठरतात. एवढंच काय पण 'मतांसाठीच घोषणांचा पाऊस' ही विरोधकांनी बेंबीच्या देठापासून ओरडून केलेली टीकासुद्धा बुळबुळीत ठरते.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### काँग्रेसची पहिली यादी आज जाहीर होणार?

मुंबई : विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसची राज्यातील उमेदवारांची पहिली यादी गुरूवारी जाहीर होण्याची शक्यता आहे. दिल्लीत झालेल्या स्क्रीनिंग कमिटीच्या बैठकीत उमेदवारांच्या नावांवर चर्चा झाल्याची माहिती आहे. त्यामध्ये विद्यमान आमदार असलेल्या ३० हून अधिक उमेदवारांच्या नावाची यादी गुरूवारी जाहीर होण्याची शक्यता आहे.


बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–१७५ गुरूवार, दि.१७ ऑक्टोबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये


**परळी** विधानसभा मतदारसंघ हा राज्याला ओळख असलेला मतदारसंघ आहे. वैद्यनाथ प्रभूंच्या पावन वास्तव्याने पुनीत झालेली भूमी, मराठवाड्यातील सर्वात जुने रेल्वे स्थानक असल्याने दळण वळणाच्या बाबतीत जोडल्या गेलेले शहर. येथील अर्थव्यवस्था ही बहुतांश कृषी केंद्रित अर्थव्यवस्था आहे. जसा हा भाग ऊसतोड मजुरांचा भाग म्हणून ओळखला जातो तसाच हा भाग विविध अंगांनी ओळखला जातो. राजकीय दृष्ट्या राज्याला परिचित असलेला हा मतदार संघ आणि तालुका आहे. पूर्वीचा रेणापूर असलेला हा मतदारसंघ १९९२ ला परळी मतदार संघात रूपांतरित झाला. या मतदार संघाचं वैशिष्टय म्हणजे हा कायम पुरोगामी विचारांच्या पाठीशी राहिलेला मतदार संघ आहे. अण्णाभाऊ गित्ते, रघुनाथराव मुंडे, पंडितराव दौंड, स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्यासारखे मोठे नेतृत्व या भागाने राज्याला दिलेले आहेत. सोयाबीन, ऊस, कापूस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या इथे मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येईल. राजकीय दृष्ट्या फार संवेदनशील असलेला हा भाग आहे. राज्यातील बड्या नेतृत्वापैकी शरद पवारांच्या आणि गोपीनाथराव मुंडे यांच्याच विचारांच्या पाठीशी उभा असलेला हा भाग आहे. अलीकडच्या काळात राजकीय अदलाबदलीत जुनेच परंतु नव्याने राजकीय पटलावर उदयास आलेले व्यक्तिमत्व म्हणजे राजाभाऊ फड... त्यांनी नुकताच शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने परळी मतदारसंघात हे नाव विशेष अर्थाने आता पुढे आले आहे. महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर जरी हे नाव नव्याने आले असेल तरीही त्यांचा राजकीय अनुभव मोठा आहे, सामाजिक कार्याचे व्यासंगी व्यक्तित्व असल्याने मोठा लोकसंपर्क आहे, कारखानदार आणि व्यावसायिक असल्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नाची जाणीव आहे, उच्च शिक्षित असल्याने महिला, मुली आणि विद्यार्थ्यांच्या नेमक्या प्रश्नांची जाण आहे. त्यांच्या व्यक्तित्वच्या जुन्याच परिचयाचा हा नव्याने धांडोळा...




# राजेभाऊ फड

## बहुआयामी उच्चशिक्षित व्यक्तिमत्व...



०३ जून १९८० रोजी राजाभाऊ फड यांचा कन्हेरवाडी येथे जन्म झाला. इथेच प्राथमिक शिक्षण झाले आणि परळी वैजनाथ येथे पुढील शिक्षण त्यांनी घेतले. पदवीचे शिक्षण पूर्ण करून बिपिएड पूर्ण केले. महाविद्यालयीन जीवनातच चळवळीचा कार्यकर्ता म्हणून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली. आज जरी राजकीय क्षेत्रात त्यांची नव्याने ओळख महाराष्ट्राला झाली असली तरी ते मागील अनेक वर्षांपासून या क्षेत्रात कार्यरत आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांच्या पक्षाचे युवक प्रदेश उपाध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले. त्यांचे सासरे आ.रत्नाकर गुट्टे यांना २०१९ विधानसभा निवडणुकीत निवडून आणण्यात "किंगमेकर" म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि त्यांनी रणमैदानात बाजी मारली. विशेष म्हणजे जनतेच्या प्रश्नांची जाण ठेवत आलेल्या अडचणींना दूर करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले आणि आजही करत आहेत. जनतेला दिलेला प्रत्येक शब्द पूर्ण करण्यासाठी ते प्रत्येकाच्या हाकेला धावून जातात. एकदा जुळलेली नाळ ते कधीही तुटू देत नाहीत त्यामुळे त्यांचा सर्वदूर जनसंपर्क आहे ही त्यांच्या जमेची विशेष बाजू आहे असे म्हणावे लागेल. प्रत्यक्षात जाऊन काम करणे याचा अर्थ काय...? तर सामाजिक आणि राजकीय जीवनात काम करत असताना ज्या लोकांच्या पाठबळावर आपण राजकारण करतो त्यांच्या प्रत्येक अडचणीला धावून जाणे हा राजाभाऊ फड यांचा स्वभाव. स्वतःच्या आईला सरपंच करण्याचे आणि हेलिकॉप्टरने गावात घेऊन येण्याचे स्वप्न त्यांनी पूर्ण करून दाखवले. "जोपर्यंत आई सरपंच आहेत तोपर्यंत गावातील प्रत्येक मुलीच्या लग्नाला १० हजार रुपयांची मदत करणार" अशी प्रतिज्ञा त्यांनी केली आणि अखंडपणे ते आजही पाळत आहेत. मागील २५ वर्षांपासून ग्रामपंचायत त्यांच्या ताब्यात आहे. सरपंच म्हणून मतदारसंघातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या गावाचा त्यांनी कायापालट करून दाखवला. शासकीय योजना खेचून आणणे, त्यांची अंमलबजावणी करणे आणि विकासाची ही गंगा सर्वसामान्य लोकांच्या उंबऱ्यापर्यंत नेण्याचे काम राजाभाऊ यांनी केले आहे. हाच वासा आणि वारसा कायम अखंडपणे त्यांनी पुढे सुरू ठेवला आहे.



### राजकीय, सामाजिक क्षेत्रातील सर्वपरिचित हक्काचा माणूस

#### उद्यमी कार्यकर्ता!

#### संवेदनशील युवा नेता

#### दूरदृष्टीचा माणूस

प्रस्थापितांच्या दबावाला बळी न पडता त्यांनी आजवर राजकारण केले. गुंडगिरी, दादागिरीला न जुमानता अनेक निवडणूका त्यांनी लढवल्या. कधी विजय वाट्याला आला तर कधी पराभव झाला. ऊन सावलीच्या या खेळाची गंमत त्यांनी पाहीलेली आहे. 2019 च्या गंगाखेड विधानसभा निवडणुकीत सासरे आ.रत्नाकर गुट्टे यांची संपूर्ण प्रचार यंत्रणा हाताळली. त्या निवडणूकीत त्यांनी श्री गुट्टे यांना निवडणूक आणले आणि किंगमेकर ठरले. राजेभाऊ फड यांनी कोद्री जिल्हा परिषदेची निवडणूक लढवली मात्र त्यात त्यांचा अल्प मतांनी निसटता पराभव झाला. परळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अटीतटीच्या निवडणुकीत त्यांनी दणदणीत विजय मिळवला. ही निवडणूक संपूर्ण राज्यात गाजली होती. कृ.ऊ.बा.च्या निवडणूकीत तर त्यांच्या समोरील उमेदवार हे आताचे आमदार आहेत. म्हणजेच अत्यंत टोकाच्या लढाया लढून एखाद्या योद्ध्याप्रमाणे त्यांनी जिंकल्या आहे. झालेच तर कन्हेरवाडी ग्रामपंचायतचा मागील अनेक वर्षांपासून ते कारभार पाहत असल्याने त्यांना मोठा राजकीय अनुभव आहे.



व्यवसायाकडून राजकारणाकडे वळत असतांना त्यांनी काही गोष्टींचा विचार नक्कीच केलेला होता. ज्या क्षेत्रात आपण जात आहोत, त्या क्षेत्राचा लोककल्याणासाठी आणि जनसेवेसाठी वापर करायचा असाच ठामनिश्चय त्यांनी केलेला होता. आजवरच्या जीवनात त्यांनी अनेक राजकीय पक्षांमध्ये काम केले. पक्ष जरी बदलले असले तरी ते नेतृत्व, ते व्यक्तीमत्व आणि त्यांच्यातील कार्यकर्तृत्वाचे गुण मात्र जशास तसेच आहेत. भाऊंच्या कामाच्या कार्यकक्षा कुठल्याही एका वर्तुळापुरत्या मर्यादीत नाहीत. सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक, धार्मिक, शैक्षणीक अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांची भरीव कामगिरी आहे. वेळ, काळ आणि प्रसंग ओळखून धावून जाण्याची त्यांच्याकडे हातोटी आहे. एरव्ही तर ते त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला पूर्ण क्षमतेने मदत करतातच, मात्र सार्वजनिक संकटांच्या काळातही ते नेहमीच निरपेक्ष भावनेने समाजसेवेसाठी पुढे असतात. कोरोना महामारीच्या काळात त्यांनी शेकडो नव्हे तर हजारो जीवांना मदत केली. निराश्रीतांना आसरा, तहानलेल्यांना पाणी, भुकेल्यांना अन्न आणि गरजूंवर उपचाराची त्यांनी सोय केली. एकूणच त्यांनी चौफेर पध्दतीचे काम या काळात त्यांनी केले. असे नव्हे की फक्त गावातील आणि शहरातील गरजवंतांच्या मदतीला ते धावून जातात, तर मतदारसंघातील शहरी आणि ग्रामिण भागातील प्रत्येकाच्या मदतीला जाण्यास ते नेहमी तत्पर असतात. मदतीचा हात पुढे करीत असतांना त्यांनी नाव, गाव, जात, पात, पक्ष, शहरी, ग्रामिण असा कधीही भेदभाव केला नाही. आपल्याकडे आलेला माणूस हा आपलाच असे ते समजतात. ज्यांनी आपल्याला जीव लावला ती जीवाची माणसं असे समजण्याचा त्यांचा स्थायी स्वभाव आहे. आगामी विधानसभा निवडणूकीस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून त्यांना तिकीट मिळण्याची दाट शक्यता आहे. त्यांनी पक्षाकडे मुलाखतसुध्दा दिलेली आहे. पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार साहेब जे सांगतील तोच उमेदवार अंतिम असून, आपणही त्यांच्याच आदेशाचे पालन करणार असल्याचे ते म्हणतात. पक्षाने दिलेला उमेदवार म्हणजे तोच आमदार हे समजून ते या निवडणूकीत कामाला लागले आहेत...

- अक्षय मुंडे

cmyk

## अग्रलेख

# छप्पर फाड निर्णय!

सरकार मग ते कुणाचेही असो निवडणुका तोंडावर आल्या की, प्रचंड कार्यतत्पर होते! सत्ताधा-यांना जनतेचा प्रचंड कळवळा येतो आणि मग सरकार 'जो जे वांछिल तो ते लाहो..' असे पसायदान आळवत जनतेच्या सुखासाठी, समृद्धीसाठी, विकासासाठी, स्वप्नपूर्तीसाठी असे झपाटल्यागत कामाला लागते की, काही विचारता सोय नाही. सरकारच्या या झपाटलेपणासमोर राज्याची तिजोरी, तिची स्थिती, तिचे स्वास्थ्य, निरंतर व शाश्वत विकासाचा मार्ग वगैरे वगैरे सगळे मुद्दे निरर्थकच ठरतात. एवढंच काय पण 'मतांसाठीच घोषणांचा पाऊस' ही विरोधकांनी बेंबीच्या देठापासून ओरडून केलेली टीकासुद्धा बुळबुळीत ठरते. मतदारांनीही सगळ्याच राजकीय पक्षांचा पुरेपूर अनुभव घेतलेला असल्याने त्यांनाही सत्तेवर कोणी का असेना व विरोधात कोणी का असेना हेच होणार हे पुरते ठाऊक असल्याने मतदार विरोधकांची टीका गांभीर्याने घेण्याची अजिबात तसदी घेत नाहीतच! मग मतदारांनी आपल्याकडे आकर्षित व्हावे यासाठी आपल्या जाहीरनाम्यात आश्वासनांची बरसात करणे विरोधकांना क्रमप्राप्त ठरते. त्यातून मग जाहीरनाम्यातील आश्वासनांचे 'वॉर' सुरू होते.

भारतातील केंद्रीय निवडणुकीपासून विधानसभेच्याच नव्हे तर स्थानिक स्वराज्य संस्थेपर्यंतच्या कोणत्याही निवडणुका बघा, तुम्हाला त्यात हाच एकमेव कॉमन व सातत्यपूर्ण पॅटर्न दिसेल! असो!! सांगायचा मूळ मुद्दा हा की, निवडणूक जवळ आली की, राजकीय पक्षांना मतदारांचा प्रचंड कळवळा येतो व ते झपाटल्यासारखे कार्यरत होतात. त्यात सत्तेवर असलेल्यांना असणारा कळवळा टोपल्याने व पोत्याने जास्त असणे ओघाने आलेच. त्यातच जर मतदारांनी लोकसभा निवडणुकीत सत्ताधा-यांवर नाराजी व्यक्त केली असेल तर मग सत्ताधारी खडबडून जागे होणे व त्यांनी ताकही फुंकून पिणे ओघाने आलेच! हेच सगळे सध्या महाराष्ट्रात घडत आहे व ते घडणे अजिबात अनपेक्षित वगैरे नाहीच. वेगळेपण जर काही असेल तर ते हेच की, विद्यमान सत्ताधा-यांनी 'छप्पर फाड' घोषणांचा व निर्णयांचा नवा विक्रम स्थापन करणे! आजवरच्या कुठल्याही सरकारने जी कार्यतत्परता दाखविली नाही ते सध्याचे सरकार दाखवते आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तर आपल्या सरकारची टॅगलाईनच 'हे देणारे सरकार आहे' अशीच करून टाकली आहे. त्यामुळे मागच्या एक महिन्यापासून मुख्यमंत्र्यांच्या या टॅगलाईनचा संपूर्ण पाईक होत त्यांचे सरकार 'मागेल त्याला, मागेल ते'या मोडमध्ये जाऊन छप्पर फाड निर्णय घेत आहे. ऑक्टोबर महिन्याच्या १४ तारखेपर्यंत महायुती सरकारने एकूण १,३४२ शासन निर्णय घेतले आहेत. त्यातील १८९ निर्णय एकट्या १४ ऑक्टोबरच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाले आहेत. याव्यतिरिक्त सरकारने गेल्या काही दिवसांमध्ये मोठमोठ्या घोषणांचाही धडाका लावला आहे. अशा घोषणांची संख्याही आता दीडशेच्या वर गेली आहे. अर्थातच हे सगळे निर्णय घेताना ते राज्याच्या तिजोरीला सोसतील का? आणि या निर्णयांचा भविष्यात निभाव लागेल का? हे प्रश्न सत्ताधा-यांच्या लेखी गौणच आहेत.

उदाहरणार्थ मुंबईत प्रवेश करताना असणा-या पाचही टोलनाक्यांवर हलक्या वाहनांना संपूर्ण टोलमाफी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. याचा अर्थ आता टोलची ही रक्कम सरकार राज्याच्या तिजोरीतून कंत्राटदाराला देणार! या टोलनाक्यांवर सर्व मिळून रोज साधारण तीन लाख खाजगी कार व लहान वाहने ये-जा करतात. त्यादृष्टीने सरकारचा हा निर्णय लाखो वाहनधारकांना दिलासा देणाराच आहे व ते या निर्णयाने खुश होणेही साहजिकच आहे. मात्र, या निर्णयापोटी राज्याच्या तिजोरीवर पाच हजार कोटी महिन्याला बोजा पडेल. मुख्यमंत्री शिंदे हा टोल आता कायमचा बंद झाल्याचे सांगत आहेत. जर खरेच तसे घडले तर मग सरकारी तिजोरीवरच्या महिन्याकाठी पाच हजार कोटी रुपयांच्या अतिरिक्त बोजाची तरतूद सरकार कोणत्या मार्गाने करणार? हा कळीचा प्रश्न! त्याचे उत्तर सरळच ते म्हणजे करवाढ! जर सरकार हे सत्य नाकारून करवाढ करणार नसल्याचा दावा करत असेल तर त्याचा सरळ-सरळ अर्थ हाच की, ही टोलमाफी फक्त निवडणुकीपुरती आहे.

बरं सरकारने दुसरा मार्ग शोधून या बोजाची तरतूद केली तरी तेवढ्यावर हा प्रश्न संपणार नाही कारण राज्यातील इतर सर्वच टोलनाक्यांवर टोलमाफीची मागणी समोर येईल व सरकारला समन्यायी पद्धतीने त्याबाबत निर्णय घ्यावाच लागेल. अशावेळी सरकार राज्याच्या तिजोरीवर वाढणा-या प्रचंड बोजाची तरतूद कुठून करणार हा प्रश्न निर्माण होतोच! अर्थातच अशा प्रश्नांची उत्तरे कुठलेच सरकार देत नाहीच त्यामुळे ती न मिळणे अपेक्षितच. मात्र, त्याची दुसरी बाजू ही की, जेव्हा अशी उत्तरे मिळत नाहीत तेव्हा तो निर्णय, त्या योजना, त्या घोषणा, ती आश्वासने ही अल्पजीवीच असतात. थेट सांगायचे तर असे निर्णय, अशा योजना, घोषणा, आश्वासने ही निवडणुकीपुरती असतात व निवडणुकीनंतर हे सगळे हवेत विरून गेलेले असते. मतदारांना हा अनुभव नवा आहे असे अजिबात नाहीच. त्यांनाही याचा अंदाज असतोच.

मात्र, पाच वर्षे आपल्याला थारा न देणारे सरकार निवडणूक काळात आपल्यासमोर हात जोडून उभे असेल व 'बोल आका क्या हुक्म है?' असे विचारत असेल तर जेवढे पदरात पाडून घेता येईल तेवढे घ्या, असाच विचार सामान्य मतदारही करतो. लाडकी बहीण, लाडका भाऊ, डझनावारी महामंडळे हे सगळे त्यातूनच येते. हे म्हणजे राज्याचा व पर्यायाने राज्यातील जनतेचा शाश्वत व सातत्यपूर्ण विकास मार्गापासूनची कायमची घेतली जात असलेली फारकतच आहे व त्यात कुणाचेही भले नाहीच! मात्र, सत्ताकारणासमोर हे सगळे शहाणपण गौणच ठरते. त्यामुळे घोषणा, निर्णय, आश्वासनांचा सार्वत्रिक व सर्वपक्षीय मुसळधार पाऊस अटळ! अतिवृष्टीने नुकसानच होते हा निसर्ग नियम! तो नियम सगळीकडेच सारखाच लागू होतो. मात्र, सत्ताकारणाने हा नियम पुरता धाब्यावर बसवला आहे आणि विद्यमान सरकारने या कामी आपल्या नावे नवा विक्रम प्रस्थापित केला आहे, हे मात्र निश्चित!

# आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी काटेकोरपणे करा -जिल्हाधिकारी पाठक

**बीड । प्रतिनिधी**





महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ साठी भारत निवडणूक आयोगातर्फे राज्यात विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम (ता.१५) घोषित करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात निवडणुकीची आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, या दृष्टीने आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी, अशा सूचना जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज अधिकाऱ्यांना केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आदर्श आचारसंहिताबाबत सर्व कार्यालय प्रमुख, पथक प्रमुखांची बैठक श्री. पाठक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ, प्र. अपर जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, बीड विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, एनआयसीचे वरिष्ठ वैज्ञानिक भाऊसाहेब बांगर यांची उपस्थिती होती.

आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून पहिल्या २४, ४८ व ७२ तासांत करावयाच्या कार्यवाहीबाबत, नेमण्यात आलेल्या विविध पथकांकडून करावयाच्या कार्यवाही बाबतचा सविस्तर आढावा जिल्हाधिकारी पाठक यांनी घेतला. त्याचबरोबर आदशर्? आचारसंहितेचे पालन करणे, विविध कार्यान्वित पथके आणि त्यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत आवश्यक त्या सूचनाही सर्व अधिकाऱ्यांना श्री. पाठक यांनी केल्या. श्रीमती जाधव, श्री. सूर्यवंशी, श्री. सोळंके यांनीही आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शन उपस्थित सर्व कार्यालय प्रमुख अधिकाऱ्यांना केले.

# राजकीय दबावाखाली केलेली स्थानबद्धता उच्च न्यायालयाकडून रद्द

**जालना । प्रतिनिधी**

राजकीय वैमनस्यातून आमदार नारायण कुचे यांनी जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाचा गैरवापर करत भाजपचे आमदार नारायण कुचे यांनी यांचा भाचा दीपक लक्ष्मण डोंगरे यावर वारंवार खोटे गुन्हे दाखल केले. शिवाय याच गुन्ह्याचा आधार घेत एमपीडीए नुसार कारवाई करत एक वर्षासाठी हर्सूल कारागृहात स्थानबद्ध केले होते. ही कारवाई करताना पोलीस प्रशासनावर दबाव आणून गैर मार्गाने एमपीडीए कारवाई करत भाचा दीपक डोंगरे यास हरसुल कारागृहात ठेवल्याचा आरोप दीपक डोंगरे यांनी केला. मात्र याच प्रकरणात न्यायव्यवस्थेने मला न्याय दिला असून उच्च न्यायालयाने माझी याचिका मंजूर करत माझी या गैरप्रकारे झालेल्या एमपीडीए कारवाईतून मुक्तता केली असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते दीपक डोंगरे यांनी पत्रकार परिषदेत दिली..



## राजकीय लाभापोटी आ.नारायण कुचे काहीही करू शकतात

मला राजकीय जीवनातून उठवण्यासाठी आणि स्वतःचा पराभव दूर करण्यासाठी आमदार नारायण कुचे काहीही करू शकतात. सध्या मला अनेक नवीन नंबर वरून कॉल येत असून भेटण्यासाठी बोलावण्यात येत आहे. शिवाय धमकवल्याही जात आहे. मी या प्रकरणात पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे नुकतीच तक्रार देखील केली आहे. नारायण कुचे माझ्यावर गंभीर स्वरूपाचे खोटे गुन्हे दाखल करू शकतात. त्यामुळे जिल्ह्यातील कोणत्याही पोलीस ठाण्यात माझ्या विरोधात तक्रार आल्यास मला बोलावून शहानिशा करावी अशी विनंती देखील मी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांच्याकडे केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, सामाजिक कार्यकर्ते दीपक डोंगरे हे भाजपा आमदार नारायण कुचे यांचे भाचे आहेत. या दोघांमध्ये गेल्या काही वर्षापासून राजकीय वाद आहेत. मात्र नारायण कुचे यांनी वारंवार पोलिसांना आणि लोकांना हाताशी धरून दीपक डोंगरे यांच्या विरोधात गंभीर स्वरूपाचे खोटे गुन्हे दाखल केले आहेत. अशा गुन्ह्यांमध्ये जिल्हा सत्र न्यायालयाने दीपक डोंगरे यांना जामीन देखील दिलेला आहे. मात्र अशाच प्रकारच्या खोट्या गुन्ह्यांचा आधार घेत आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये राजकीय नुकसान होऊ नये याकरिता नारायण कुचे यांनी दीपक डोंगरे यांना एमपीडीए कारवाईत अडकवण्याचे षडयंत्र रचले. कार्यालयाचा वापर करत गैरप्रकारे एमपीडीए कारवाई करत भाचा दीपक डोंगरे यास हरसुल कारागृहात एका वर्षासाठी स्थानबद्ध केले होते. मात्र या प्रकरणात दीपक डोंगरे यांनी उच्च न्यायालयात दाद मागत मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर येथील खंडपीठात याचिका दाखल केली होती. आणि याच प्रकरणात दीपक डोंगरे यांची एमपीडीए कारवाईतून मुक्तता करत दीपक डोंगरे यांची याचिका मंजूर केली आहे. मात्र अशा प्रकारे प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी राजकीय नेत्यांच्या दबावाला बळी पडून सर्वसामान्य तरुणांचे आयुष्य उध्वस्त करत असल्याने जनतेने न्याय कोणाकडे मागावा असा प्रश्न उपस्थित झाला आहे. विशेष म्हणजे ही एमपीडीए कारवाई करताना तत्कालीन स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ आणि त्यांच्या टीमने सामाजिक कार्यकर्ते दीपक डोंगरे यांना पंढरपूरच्या श्री विठ्ठलाच्या वारीतून उचलून आणले होते. नेहमी एमपीडीए कारवाई केल्यानंतर प्रेस नोट काढून पत्रकारांना माहिती दिली जाते. मात्र दीपक डोंगरे यांच्यावर केलेल्या कारवाईची माहिती हेतुपुरस्सर माध्यमापासून लपवली गेली होती. माध्यम प्रतिनिधी प्रश्न उपस्थित करतील याची जाणीव पोलीस प्रशासनाला होती. तरीही पोलीस प्रशासनाने अशाप्रकारे बेकायदा कारवाई करून मला आमदार नारायण कुचे यांच्या सांगण्यावरून जेलमध्ये ठेवल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते दीपक डोंगरे यांनी केला.

# आदर्श इंटरनॅशनल स्कूल येथे डॉ. अब्दुल कलाम यांची जंयती संपन्न

**अंबड । प्रतिनिधी**

आदर्श ग्रुप ऑफ एज्युकेशन अंबड अंतर्गत, आदर्श इंटरनॅशनल स्कुल पारनेर, येथे डॉ.ए. पी. जे अब्दुल कलाम जंयती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली .यावेळी संस्थापक अध्यक्ष मा.श्री.अशोक भाऊ लांडे सर व संस्थापक सचिव सौ.शिलाताई लांडे मॅडम यांच्या शुभहस्ते या महापुरूषांचे प्रतिमा पुजन करण्यात आले.



आपल्या मार्गदर्शनपर भाषणात मा.श्री. अध्यक्ष सरांनी ए.पी.जे. अब्दुल कलाम साहेब यांचा जीवन परिचय करून दिला. अवुल पाकीर जैनुलाब्दिन तथा ए.पी.जे अब्दुल कलाम (१५ ऑक्टोबर १९३१ – २७ जुलै २०१५) हे एक भारतीय एरोस्पेस शास्त्रज्ञ होते. तसेच त्यांनी २००२ ते २००७ या काळात भारताचे वे११ राष्ट्रपती म्हणून देखील काम केले होते. कलाम हे तामिळनाडूच्या रामेश्वरम येथे वाढले होते, आणि तेथेच त्यांनी भौतिकशास्त्र आणि एरोस्पेस अभियांत्रिकीचा अभ्यास केला. त्यांनी पुढील चार दशके शास्त्रज्ञ आणि विज्ञान प्रशासक म्हणून, प्रामुख्याने संरक्षण संशोधन आणि विकास संस्था () आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था () येथे काम केले.

तसेच या जंयतीचे ओचित्य साधत इयत्ता तीसरी ते सातवी या वर्गातील विद्यार्थ्यांचे वाचन घेऊन कलाम साहेबांना अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका सौ.गीता जाधव मॅडम,उपमुख्याध्यापक श्री. भाऊसाहेब बारहाते सर, वस्तीगृह काळजीवाहक सौ. शितल टकले मॅडम, सौ. रेणुका कुलकर्णी मॅडम, श्री. प्रविण राठोड सर,श्री. श्रीकांत देशमुख सर,श्री. योगेश सुर्यवंशी सर, सौ. प्रतिभा मॅडम,श्री. सोमेश शिमरे सर,श्री. अर्जुन गव्हाणे सर, ,श्री. गणेश वाघ सर,हाजी सदफ शेख मॅडम,वैष्णवी कदम मॅडम,सौ. कोमल गाडेकर मॅडम,श्री. राम हामने सर, श्री.निखील पाटील सरसौ. संध्या नवले मॅडम श्री. अक्षय घाणे सर आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन श्री. अरविंद जैस्वाल सर यांनी केले. तर आभार कुलकर्णी मॅडम यांनी मानले.

# पंडितराव बोराडे यांना मराठवाडा भूषण पुरस्कार

**जालना । प्रतिनिधी**



मराठवाडा सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य सामाजिक संघटना असून सर्व जाती धर्म, जात,पंथ च्या पलीकडे असुन फाऊंडेशन ने नाशिक मध्ये दसरा मेळाव्या निमीत्ताने सिडको नाशिक येथे माऊली लॉन्स येथे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा मराठवाडा भूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात येते सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना निस्वार्थीपणाने पत्रकारितेच्या माध्यमातून अन्याय विरोधात आणि गोरगरीब, पिडित यांच्यावर होतं असलेल्या अन्यायाविरुद्ध प्रखड लिखाण करुन न्याय मिळवून दिला. पंडितराव बोराडे यांनी विशेष काम केले आहे तसेच मराठवाडा सामाजिक फाऊंडेशनचे ते प्रदेश सचिव असल्याने त्यामध्येही त्यांनी विविध सामाजिक कार्य केले आहे.

या कार्याची दखल घेऊन मराठवाडा सामाजिक फाऊंडेशन नाशिक महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने त्यांना मराठवाडा भूषण पुरस्कार प्रदान करुन येथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टी चे प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, कामगार नेते डॉ डी.एल.कराड, भाजपा जिल्हाध्यक्ष सुनिल बच्छाव, डॉ. रमेश घाडगे , कॉग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष शरद आहेर, आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत, आंतर राष्ट्रीय जिमनॅस्टिक खेळाडू अभिषेक शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष भाजपा प्रवक्ते लक्ष्मण सावजी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, जसा खांदेश महोत्सव नाशिक शहरात होतो त्याच प्रमाणे नाशिक मध्ये मराठावाडा महोत्सव सुरू करावा. व्यवस्थित नियोजन करून एक चांगला उपक्रम या माध्यमातून सुरू करता येईल.

यावेळी प्रमुख उपस्थितीत डॉ. डी.एल.कराड, सुनिल बच्छाव ,शरद आहेर, डॉ रमेश घाडगे बापुसाहेब शिंदे, आदींनी मार्गदर्शन केले.या प्रसंगी विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आबासाहेब टरपले यांनी केले तर सुत्र संचालन पुनम शिरोळ यांनी केले. उपस्थित मराठवाडा फाउंडेशनचे बी.एस.बोखारे ,डि.एस.कातारे, शरद राजबिंडे , जालना जिल्हाध्यक्ष रमेश देशपांडे , महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा मंठा तालुका अध्यक्ष पत्रकार बालाजी कुलकर्णी अशोक शेळके शिवाजीराव बल्लाळ, अजय आघाव, बाबासाहेब डख, नारायण वांढेकर, बापूराव टरपले, मुंजा भाऊ, शेळके चिंतामण मुंडे, ओंकारेश्वर गांजवे,राजेंद्र तनपुरे, नामदेव नवघरे तसेच मराठवाडा सामाजिक फाऊंडेशन चे पदाधिकारी व नाशिक शहर परिसरातील मराठवाड्यातील रहीवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ६ वरून...

## बीडमध्ये निवडणुकीसाठी

जनसंपर्क अधिक प्रभावी कसा करता येईल, याचे धडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे देण्यात आले. पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी आढावा घेतल्यानंतर बीड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निवडणूक लढवण्यासाठी सज्ज असल्याचे विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी स्पष्ट केले आहे.

बीडची जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडेच

यापूर्वी अनेकदा बीड विधानसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाच मिळणार असल्याचा दावा खुद्द उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी देखील केलेला आहे. तसेच महायुतीकडून सुरू असलेल्या वाटाघाटीत बीडच्या जागेवर शिक्कामोर्तब झाले असून ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाटेला जाणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

अनेक महिन्यांपासून कंपनीकडून प्रचार

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात पक्ष निवडणुकीस सामोरे जाणार आहे. पक्षाच्या एका खाजगी कंपनीकडून गेल्या अनेक महिन्यांपासून संभाव्य उमेदवारांसाठी फायदा होईल, यादृष्टीने प्रचार, प्रसार व सर्व्हेक्षण केले जात आहे. याशिवाय, नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ देण्यावर भर दिला होता.

## सहा विधानसभा मतदारसंघात

आहेत. यासह संवेदनशील मतदान केंद्रे, बॅलट, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅट, पोलिस पथके, निमलष्करी पथके, स्थिर पथके आदींची माहितीही श्री. पाठक यांनी दिली. या माहितीसह आवश्यक त्याप्रमाणात पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध असल्याचेही श्री. पाठक यांनी यावेळी पत्रकारांना सांगितले. यावेळी जिल्हा प्रशासनाच्यावतीने संकलित करण्यात आलेल्या निवडणुकीशी संबंधित आवश्यक माहितीची संदर्भ पुस्तिकाही उपस्थित पत्रकारांना देण्यात आली.

असा आहे निवडणूक कार्यक्रम

निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्याचा दिनांक २२ ऑक्टोबर २०२४

नामनिर्देशनपत्रे सादर करण्याचा अंतिम दिनांक- २९ ऑक्टोबर २०२४

नामनिर्देशन पत्रांची छाननी- ३० ऑक्टोबर २०२४

उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिनांक- ४ नोव्हेंबर २०२४

प्रत्यक्ष मतदानाचा दिनांक- २० नोव्हेंबर २०२४

मतमोजणी दिनांक- २३ नोव्हेंबर २०२४

निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचा दिनांक- २५ नोव्हेंबर २०२४

## संघटनेला राजकारण नाही

पान ६ वरून...

भाषणातून मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी वक्त्यांनी भाषणातून शिक्षण हा समाज सुधारण्याचा मुख्य पाया असून शिक्षणानेच माणूस मोठा होतो. शिक्षणाने कुटुंबाची व समाजाची प्रगती होते.शिक्षणाने संघर्ष करण्याची प्रेरणा मिळते.शिक्षणाअभावी भटक्या- विमुक्त जाती-जमाती मागासलेल्या आहेत.त्यासाठी सर्व समाजबांधवांनी एकत्रित येऊन संघटित व्हावे व आपल्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून उच्च शिक्षण द्यावे व पारंपारिक व्यवसायात गुरफटून न राहता शिक्षणावर भर द्यावा.तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजे छत्रपती शाहू महाराज, सावित्रीबाई फुले,महात्मा ज्योतिबा फुले यांचा आदर्श व शिकवण आचरणात आणण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला भटके-विमुक्त जाती जमाती समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.कार्यक्रमाचे आयोजन हनुमंत धनवटे महाराज बीड जिल्हाध्यक्ष यांनी उत्कृष्ट केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ जाधव यांनी केले.

## जागतिक अंध दिनाचे औचित्य

असून उद्देशपूर्तीसाठी राज्यभरात विविध कार्यक्रम राबवत असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर माधव गोरे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात दिली. अनिकेत लोहिया यांनी याप्रसंगी मार्गदर्शन पर भाषण केल.

याप्रसंगी अंबाजोगाई येथील श्री सुहास पाठक आणि मित्र परिवारातर्फे मराठवाड्यातील अंध व्यक्तींना पांढऱ्या काठीचे वितरण अनिकेत लोहिया आणि पुरुषोत्तम चोखडा यांच्या हस्ते देण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुहास पाठक, जयप्रकाश भुतडा, राजू चोखडा, ईश्वर भुतडा सोमवंशी महाराज यांचे सहकार्य लाभले. व्यासपीठावर संस्थेचे सचिव संदीप चोपडे, सह सचिव मीरा चोपडे आणि सहसचिव प्रशांत गवंडगावे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी बीड ,लातूर, धाराशिव ,नांदेड, जालना ,छत्रपती संभाजीनगर, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यातून १५० दिव्यांग व्यक्ती सहभागी झाले होते. सकाळी पांढरी काठी जनजागृती फेरी अंबाजोगाई शहरातून काढण्यात आली. या फेरीमध्ये शंभरहून अधिक अंध व्यक्ती सहभागी झाले होते. कार्यक्रमाच प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन डॉ. माधव गोरे यांनी केले, तर आभार सचिव प्रशांत गवंडगावे यांनी मानले. कार्यक्रमाला सर्व स्तरातील नागरिक उपस्थित होते.

## तलवाड्यात बदामराव पंडितांच्या

आहे. शिवसेना बीड जिल्हा समन्वयक तथा जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती पंडित आणि युवा नेते यशराज पंडित यांनी सर्वांचे गळ्यात भगवे रुमाल घालून स्वागत केले.

बदामराव पंडित यांना आमदार करण्यासाठी आम्ही दिवसरात्र गावोगाव जाऊन, मतदारांच्या भेटी घेऊन जास्तीत जास्त मतदान शिवसेना आणि महाविकास आघाडीला करून घेण्यासाठी काम करणार असल्याचे शिवसेना प्रवेश केलेल्या या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी शिवसैनिक बहुसंख्येने उपस्थित होते.

---------

दैनिक राज्य लोकतंत्र
गुरुवार, दि.१७ ऑक्टोबर २०२४


## काळा पैसा वापरला जात असल्यास माहिती देण्याचे आवाहन

बीड : महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये काळा पैसा वापरला जात असल्याची माहिती, रोख रकमेचे वाटप, रोख रकमेची हालचाल याबाबत विश्वसनीय माहिती असल्यास ती नि:संकोच पणे द्यावी, असे आवाहन नागपूरच्या आयकर प्रधान संचालक कार्यालयाचे आयकर उपसंचालक (तपास) अनिल खडसे यांनी केले आहे. माहिती देणाऱ्याची ओळख गुप्त ठेवण्यात येईल, असेही त्यांनी म्हटले आहे. माहिती पाठविण्यासाठी टोल फ्री क्रमांक १८००-२३३-०३५५, १८००-२३३-०३५६, छायाचित्रे, व्हिडिओ इत्यादी पाठविण्यासाठी व्हाटसअप क्र. ९४०३३९०९८० आहेत. निवडणुकी दरम्यान काळ्या पैशांचा वापर रोखण्यासाठी प्राप्तीकर विभागास सहकार्य करावे, असेही त्यांनी आवाहन केले आहे.

## महादेव जानकर महायुतीतून बाहेर

मुंबई-महाराष्ट्राच्या राजकारणात आता ट्विस्ट येण्याची शक्यता आहे. कारण राष्ट्रीय समाज पक्षाचे सर्वेसर्वा महादेव जानकर यांनी टोकाचा निर्णय घेतला आहे. महादेव जानकर यांनी थेट महायुतीमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. महादेव जानकर हे राज्यातील विधानसभेच्या सर्व २८८ जागा लढवण्यावर ठाम आहेत. ते प्रत्येक मतदारसंघात उमेदवार उभे करणार आहेत. त्यामुळे महायुतीची डोकेदुखी वाढण्याची जास्त शक्यता आहे.

# गव्हासह ६ पिकांच्या हमीभावात वाढ

## शेतकऱ्यांना दिलासा: मोदींच्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय



- १. गहू – १५० रु. वाढ, हमीभाव २ हजार ४७५ रूपये
- २. मोहरी– ३०० रु. वाढ, हमीभाव ५ हजार ९५० रूपये
- ३. जवस– १३० रु.वाढ, हमीभाव १ हजार ९८० रूपये
- ४. हरभरा– २१० रु. वाढ, हमीभाव ५ हजार ६५० रूपये
- ५. मसूर– २७५ रु. वाढ, हमीभाव ६ हजार ७०० रूपये
- ६. करडई–१४० रु. वाढ, हमीभाव ५ हजार ९४० रूपये





नवी दिल्ली । वृतसंस्था

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज केंद्रीय कॅबिनेटची बैठक पार पडली. या मंत्रिमंडळ बैठकीत शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून गहू, मोहरीसह ६ पिकांच्या हमीभावात वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.**

गत ुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत प्रधानमंत्री गरी कल्याण अन्न योजनेअंतर्गत पोषणतत्वांनी संपन्न असा तांदूळ मोफत देण्यात येतो त्यास आणि इतर कल्याणकारी योजनेंतर्गत मुदत जुलै २०२४ वरुन डिसेंबर २०२८ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्र सरकारच्या या योजनेमुळे ८० कोटी पात्र लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य मिळणार आहे. त्यानंतर, आज झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांना डोळ्यासमोर ठेऊन केंद्र सरकारने ६ पिकांच्या हमीभावाच्या रकमेत वाढ केली आहे. त्यामध्ये, गव्हाच्या हमीभावात १५० रुपयांची वाढ, तर मोहरीच्या हमीभावात ३०० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत ६ पिकांच्या हमीभावात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, देशभरातील कोट्यवधी शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. महाराष्ट्रातील गहू उत्पादक आणि हरभरा पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे, सरकारच्या या निर्णयाचा राज्यातील शेतकऱ्यांनाही मोठा लाभ होईल.

### महागाई भत्त्यात ३ टक्क्यांची वाढ

केंद्र सरकारने आजच्या कॅबिनेट बैठकीत लाखो कर्मचारी आणि पेन्शनर्स यांच्यासाठी देखील मोठा निर्णय घेतला आहे. दिवाळीपूर्वीच केंद्र सरकारच्या सेवेतील कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या कॅबिनेटची बैठक आज पार पडली. या बैठकीत डीए आणि डीआरमध्ये ३ टक्के वाढ करण्यास मंजुरी दिली आहे. महागाई भत्ता वाढवण्यात आला असून तो १ जुलै २०२४ पासून लागू असेल. यामुळे लाखो कर्मचारी आणि पेन्शनर्सला लाभ होणार आहे. केंद्राच्या सेवेत ४९ लाख कर्मचारी आहेत तर, ६० लाख निवृत्तीवेतनधारक आहेत.

### मोफत तांदूळ योजना २०२८ पर्यंत

दरम्यान, गत आठवड्यातील केंद्रीय कॅनिट बैठकीत प्रधानमंत्री गरी कल्याण अन्न योजनेअंतर्गत पोषणतत्वांनी संपन्न असा मोफत तांदूळ देण्याच्या योजनेला वाढ देण्यात आली आहे. सन २०२८ ही पर्यंत ही मोफत तांदूळ योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेला केंद्र सरकारकडून १०० टक्के अर्थसहाय्य करण्यात येते. या योजनेद्वारे देशभरातील पात्र रेशन कार्ड धारकांना मोफत तांदूळ वितरण केले जातो. या योजनेद्वारे रेशनकार्ड धारकांना दरमहा ५ किलो तांदूळ देण्यात येतो. आता केंद्र सरकारने या योजनेला मुदतवाढ देताना पोषणतत्त्वांनी समृद्ध असा तांदूळ मोफत पुरवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## राज्य शिक्षण मंडळाच्या संचालकपदी प्रा. सोमनाथ बडे

बीड । प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळाच्या संचालकपदी मकरध्वज शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. सोमनाथराव बडे यांची निवड करण्यात आली आहे. प्रा. बडे यांनी यापुर्वी शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान दिले असून त्यांच्या या कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे. त्यांचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे.

## राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत पुन्हा एकदा माजलगावचा दबदबा

### पैलवान सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदकाचा मानकरी

माजलगाव । प्रतिनिधी

**महाराष्ट्र शासन अंतर्गत राज्यस्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धा २०२४-२५ (१९ वर्षाखालील – फ्रीस्टाईल) ता. १४/१५ ऑक्टोबर २०२४ रोजी बाबुजी आव्हाड महाविद्यालय पाथर्डी, जि. अहमदनगर येथे पार पडल्या. छत्रपती संभाजी नगर विभागातून ७० किलो वजन गटातून आलेला पै. सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर याने ३ राऊंड खेळून फाइनल कुस्ती १०-० अश्या मोठ्या फरकाने विजय मिळवत राज्यात पुन्हा एकदा कुस्ती प्रकारात माजलगाव चा दबदबा कायम ठेवत सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला आहे.**

पैलवान सुमितकुमार सध्या माजलगाव येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात शिकत असून, रुस्तुम ए हिंद पै. अमोल बुचूडे कुस्ती



केंद्र पुणे येथे कुस्तीचे प्रशिक्षण घेत आहे. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदकाचा मानकरी ठरलेला पै. सुमीतकुमार याची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली असून उत्तरप्रदेश मेरठ येथे होणाऱ्या स्पर्धेत पुन्हा एकदा महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करणार आहे. तसेच महारष्ट्राला या राष्ट्रीय स्पर्धेत सुमितकुमार राज्याला सुवर्णपदक मिळून देणार का, याकडे आत्ता सर्वांचे लक्ष वेधले आहे. तसेच, या अभूतपूर्व यशाबद्दल पै. सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर याने सुवर्णपदक जिंकून राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरल्याने सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे प्राचार्य,क्रीडा विभागाचे प्राध्यापक श्री आवारे सर, पुणे येथील प्रशिक्षक, वस्ताद व आई वडील यांच्यासह तालुक्यातील सर्वसामान्य लोकांसह जिल्हाभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## आष्टीत महायुतीचा उमेदवार कोण?

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

भाजपचे माजी आमदार भीमराव धोंडे यांना आष्टी विधानसभा मतदारसंघासाठी महायुतीकडून उमेदवारी मिळाली, तर आपण बिनशर्त माघार घेऊ आणि धोंडे यांचा प्रचार आदी करू, असे अजित पवार गटाचे आ. बाळासाहेब आजबे यांनी सांगितले. आष्टी तालुक्यातील एका कार्यक्रमात आमदार आजबे यांनी पाठिंब्याबाबत केलेली घोषणा आष्टी मतदारसंघात चर्चेचा विषय झाला. आष्टी विधानसभा मतदारसंघ पक्ष श्रेष्ठींचा कौल कुणाच्या पारड्यात सोमवारी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे यांनी माजी आमदार भीमराव धोंडे यांना महायुतीकडून उमेदवारी भेटली तर प्रचार करणार असे घोषित केले असले तरी माजी मंत्री सुरेश धस यांची उमेदवारीसाठी दावेदारी कायम असल्याने महायुतीच्या पक्ष श्रेष्ठींचा कॉल कुणाच्या पारड्यात पडतो याची उत्सुकता वाढली आहे. महायुतीच्या उमेदवारी मिळविण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे, भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार सुरेश धस तीन आजी माजी आमदार इच्छुक आहेत. त्यामुळे महायुतीपुढे मोठा पेच उभा ठाकला होता; परंतु सोमवारी विद्यमान आमदारांनी माजी आमदार भीमराव धोंडे यांना महायुतीकडून उमेदवारी मिळाली तर त्यांचा प्रचार करण्याचे जाहीर केल्याने मतदारसंघात नवीन चर्चेला उधाण आले आहे.

## आझाद क्रांती सेनेच्या वडवणी तालुका सचिवपदी मंगेश शिंदे



वडवणी । प्रतिनिधी

आझाद क्रांती सेनेची पाळेमुळे हळू हळू महाराष्ट्रामध्ये रुजायला सुरुवात झाल्याने कार्यकर्त्यांच्या चेह-यावर आंनद दिसुन येत आहे.आज दि १६-१०-२०२४ रोजी आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व वडवणी ता प्रमुख महादेव आवाड यांच्या साक्षीने आझाद क्रांती सेनेच्या वडवणी ता सचिवपदी मंगेश शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली.यावेळी मंगेश शिंदे यांचा शाल श्रीफल व फेटा बांधुन मोठा सत्कार राजेश घोडे यांच्या वतीने करण्यात आला.

यावेळी तालुक्यातील आझाद क्रांती सेनेचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी मंगेश शिंदे यांनी सांगीतले की वडवणी तालुक्यातील सर्व सहकारी यांना सोबत घेऊन गाव तिथं शाखा करण्यासाठी प्रयत्न करणार आसल्याचे यावळी मंगेश शिंदे यांनी सांगीतले.आझाद क्रांती सेनेच्या माध्मातुन सर्व सामांन्याचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सुद्धा प्रयत्न करणार आहे.यावेळी आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे,ता प्रमुख महादेव आवाड,ऊसतोड कामगार ता प्रमुख सतीश हाणवते,धारुर ता प्रमुख बळीराम मस्के, भागवत शिंदे, बप्पा शिंदे,अंकुश आडागळे, यांच्या सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## घनसावंगी मतदार संघावर शिवसेना उद्धव ठाकरे गटाचा दावा

### माजी आ.शिवाजी चोथे करणार उद्धव ठाकरेंकडे उमेदवारीची मागणी

घनसावंगी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते राजेश टोपे यांच्या मतदार संघावर आता शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून दावा करण्यात आला आहे.विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून आता सर्वच पक्षांचे मेळावे पार पडताना दिसत आहेत.दरम्यान दि १६ रोजी अंबड विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार शिवाजीराव चोथे यांनी घनसावंगी मतदार संघावर दावा सांगितलाय.महाविकास आघाडीत घनसावंगीची जागा शिवसेना उध्दव ठाकरे गटाला सोडून घेण्यात यावी अशी मागणी उद्धव ठाकरेंकडे करणार असल्याचे शिवाजी चोथे यांनी शिवसैनिकांच्या निष्ठावंतांच्या मेळाव्यामध्ये सांगितलंय.या आधी देखील हा मतदार संघ ठाकरे गटाकडे घ्यावा अशी मागणी करण्यात आली असून आता शिवसैनिकांना सोबत घेऊन उद्धव ठाकरेंना भेटणार असल्याचं सांगत ही जागा शिवसेना ठाकरे गटाला न सुटल्यास शिवसैनिकांना विचारात घेऊन पुढील निर्णय घेणार असल्याचे देखील शिवाजीराव चोथे



यांनी शिवसैनिकांच्या निष्ठावंतांच्या मेळाव्या दरम्यान सांगितलंय त्यामुळे आता घनसावंगीत महाविकास आघाडी मध्ये देखील फूट पडते की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे दरम्यान मागील २५ वर्षापासून आ. राजेश टोपे यांचा घनसावंगी बालेकिल्ला आहे.मात्र यावेळी त्यांना टक्कर देण्यासाठी हिकमत उढाण यांनी उद्धव ठाकरे गट सोडून शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर राजकीय चर्चेना उधान आलं होतं मात्र घनसावंगीत महाविकास आघाडीमध्ये बिघाडी होते की काय असा प्रश्न उपस्थित होत आहे याच कारण म्हणजे शिवाजीराव चोथे यांनी देखील घनसावंगी मतदारसंघावर आपला दावा केलाय त्यामुळे आता शिवाजीराव चोथे यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले असून ते महाविकास आघाडी सोडून विधानसभेच्या जागेसाठी बंड करतात की काय?असा सवाल उपस्थित होत आहे.

## धानोरा महाविद्यालयाचा प्रथमेश माने कुस्ती स्पर्धेत राज्यात प्रथम

म्हसोबावाडी । पतिनिधी

आष्टी तालुक्यातील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय धानोरा येथे इयत्ता बारावीमध्ये शिक्षण घेत असलेला प्रथमेश हनुमंत माने या विद्यार्थ्याने अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयात राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये प्रथमेश माने याने ८६ किलो वजन गटात कुस्ती प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. याविषयी अधिक माहिती अशी की धानोरा येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा येथे इयत्ता बारावी मध्ये शिक्षण घेत असलेला प्रथमेश माने याने आतापर्यंत तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय, विभागस्तरीय कुस्तीमध्ये अनेक पारितोषिके मिळवलेले आहेत. सोमवार दिनांक १५ ऑक्टोबर रोजी अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयामध्ये राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा घेण्यात आल्या. या कुस्ती स्पर्धेमध्ये प्रथमेश माने या खेळाडूने पुणे, जळगाव व कोल्हापूर येथील मल्लांना एका क्षणात आसमान दाखवत प्रथम क्रमांक पटकावला. यानंतर दिनांक १८ ऑक्टोबर रोजी यवतमाळ येथे राज्याचा संघ निवडण्यात येणार आहे. प्रथमेश माने हा २२ ऑक्टोबर रोजी दिल्ली येथे राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेमध्ये खेळणार आहे. प्रथमेश माने हा वारजे पुणे येथे कुस्तीचे धडे घेत आहे. प्रथमेश चे वडील हनुमंत माने हे राष्ट्रीय कबड्डी चे खेळाडू आहेत. त्यांचे मार्गदर्शन प्रथमेश ला मिळत आहे.मिळवलेल्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार भीमरावजी धोंडे साहेब, प्रशासन अधिकारी डॉ. डी बी राऊत, शिवदास विधाते, माऊली बोडखे, दत्ता गिलचे, प्राचार्य डॉ भगवानराव वाघुले, डॉ कैलास वायभासे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ सुभाष नागरगोजे, स्टाफ सेक्रेटरी प्रा निसार शेख, प्रा आजिनाथ गिलचे, प्रा ज्ञानदेव बोडखे, प्रा विवेक महाजन, प्रा गहिनीनाथ एकशिंगे, प्रा सुभाष मोरे, प्रा राजू शेलार, प्रा राजेंद्र मिसाळ, प्रा आतेश बनसोडे, प्रा सतीश तागड, प्रा डॉ संजय झांजे, डॉ उस्मानखान पठाण आदींनी अभिनंदन करून दिल्ली येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१६ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १.०० क्विंटल | २,४५१ | २,४५१ | २,४५१ |
| ज्वारी/हायब्रिड:१०५.०० क्विंटल | २,१४१ | २,९५६ | २,३५९ |
| मका/लोकल :५.५० क्विंटल | २,४५० | २,४५० | २,४५० |
| तूर :७.५० क्विंटल | ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| उडीद : ४८.०० क्विंटल | ५,३२० | ७,६०० | ६,९२३ |
| बाजरी :८०.०० क्विंटल | २,२०० | २,८६० | २,५२९ |
| मुग : १०.५० क्विंटल | ६,६९० | ७,१०० | ६,९६४ |
| सोयाबीन:५४४.०० क्विंटल | ३,४५० | ४,४३६ | ४,०४४ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ६,५५० | ६,५५० | ६,५५० |


# बंडोबांना थंड करण्यासाठी महामंडळांची लॉटरी

## २७ जणांना महामंडळावर संधी; कल्याण आखाडे, प्रशांत परिचारक यांचा समावेश

मुंबई । प्रतिनिधी

**ऐन विधानसभा निवडणुकांच्या राजी-नाराजी नाट्यापूर्वीच अनेकांचे बंड थमवण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे. त्यामध्ये, महाराष्ट्र राज्य सहकार कृषी पणन मंडळाच्या अध्यक्षपदी भाजप नेते प्रशांत परिचारक आणि बीड जिल्ह्यातील ओबीसी नेते व सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे यांची महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. राज्यातील २७ जणांना हांडळावर संधी देण्यात आली आहे.**

राज्य सरकारने याच महिन्यात मंत्रिमंडळ ैठकीत महत्त्वाचे निर्णय घेतले होते, त्यामध्ये विविध महामंडळांच्या निर्माणाची घोषणा केली होती. त्यात, परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना ३ ऑक्टोबर २०२४ रोजी शासन निर्णय (नियोजन विभाग) कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम ८ मधील तरतुदीनुसार करण्यात आली होती. त्यानुसार आज आशिष दामले यांची निवड करण्यात आली तर तुषार पवार आणि बापू भेगडे यांची महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील कलम १२





(२)()मधील तरतुदीनुसार संदर्भ क्र. १ अन्वये ही निवड करण्यात आली आहे. दरम्यान, महामंडळावर निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी अभिनंदन केले आहे. तर, पंढरमधून विधानसभेसाठी इच्छुक असलेल्या भाजपच्या प्रशांत परिचारक यांना सहकार कृषी पणन महामंडळाच्या अध्यक्षपदी संधी देण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील ओबीसी नेते कल्याण आखाडे ंना संधी देण्यात आली असून यांची महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या उपाध्यक्षपदी वर्णी लावण्यात आली आहे. त्यामुळे निष्ठावंताला उपमुख्री अजित पवार आणि कृषींत्री धनंजय मुंडे ंनी न्या दिला आहे.

### राज्यातील २७ महामंडळांवर नियुक्त्या

महाराष्ट्र रोजगार हमी परिषद – शहाजी पवार, अध्यक्ष, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ – दिलीप कांळे, अध्यक्ष, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक समिती – सचिन साठे, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग – सतीश डोगा अध्यक्ष, मुकेश सारवान उपाध्यक्ष, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ – निलय नाईक, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळ – अरविंद पोरट्टीवार, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार कृषी पणन मंडळ – प्रशांत परिचारक, अध्यक्ष, मौलाना आझाद अल्पसंख्यांक विकास महामंडळ – इद्रिस मुलतानी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य यिाणे महामंडळ – प्रमोद कोरडे, अध्यक्ष, महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषद – प्रमोद कोरडे, अध्यक्ष, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र राज्य मेंढी व शेळी विकास महामंडळ – विजय वडकुते अध्यक्ष, ाळासाहे किसवे, संतोष महात्मे उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पेट्रोकेमिकल्स महामंडळ – अतुल काळसेकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ – राजेश पांडे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य गोपीनाथ मुंडे ऊस तोड कामगार मंडळ – गोविंद केंद्रे, अध्यक्ष, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) – ळीराम शिरसकर, सदस्य, राजे उमाजी नाईक आर्थिक विकास मंडळ – दौलत शितोळे, उपाध्यक्ष, महाराष्ट्र वन विकास महामंडळ – अतुल देशकर, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक वेतन समिती – नरेंद्र सावंत, अध्यक्ष, महिला आर्थिक विकास महामंडळावर (माविम) – मिनाक्षी शिंदे, अध्यक्षा, राणी द्विवेदी, उपाध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ – काशिनाथ मेंगाळ, अध्यक्ष, कै मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ – विजय चौगुले, उपाध्यक्ष, आण्णासाहे पाटील आर्थिक विकास महामंडळ, मुंई – अजय बोरस्ते, उपाध्यक्ष, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ – भाऊसाहे चौधरी, उपाध्यक्ष, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळांवर – आनंद जाधव, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ – कल्याण आखाडे, उपाध्यक्ष, राज्य कंत्राटी कामगार सल्लागार मंडळ – श्रीनाथ भिमाले, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ग्राहक संरक्षण परिषद – संदीप लेले अध्यक्ष, अरुण जगताप उपाध्यक्ष

# सीलिंग कायदा शेतकरी विरोधी आहे का? -अमर हबीब

सीलिंगच्या कायद्यामुळे भारतीय शेतकऱ्यांच्या आयुष्यात कोणते बदल झाले. सीलिंगच्या कायद्यामुळे खरचं भूमीहिनांना जमिनी मिळाल्या का? एकंदरीत या कायद्यामुळे शेतकऱ्यांच्या आयुष्यात काय बदल झाले? याबाबत किसानपुत्र आंदोलनाचे नेते अमर हबीब यांनी भाष्य केले आहे. सीलिंगच्या कायद्याचे त्यांनी सविस्तर विश्लेषण केले आहे. ते काय काय म्हणाले जाणून घेऊयात अमर हबीब म्हणाले, होय! कारण असा कायदा इतर क्षेत्रांना लागू नाही. कारखानदाराने किती कारखाने काढावे, किती मालमत्ता जमवावी, डॉक्टरांनी किती पेशंटांकडून फी घ्यावी, वकिलांनी महिन्याला किती खटले दाखल करावेत, असे कोणतेच बंधन नाही. केवळ शेतकऱ्यांवर बंधन घालणे अन्यायकारक आहे. म्हणूनच तो शेतकरी विरोधी कायदा आहे.

भूमीहिनांना जमिनी मिळाव्यात म्हणून पुरोगामी पक्ष-संघटनानी आंदोलने केली. कायदा झाला ते चुकीचे झाले का? स्थावर मालमत्ता प्रत्येकाकडे असायला हवी. भूमीहिनांना जमीन वाटण्यास आमचा विरोध नाही. मात्र शेतकऱ्यांकडून परस्पर सक्तीने काढून देण्यास मात्र विरोध आहे. सरकारने शेतकऱ्यांकडून जमिनी विकत घेऊन वाटप कराव्यात. जे शेतीत अडकून पडले त्यांचे नुकसान झाले. ज्यानी बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्देशानुसार किंवा अन्य कारणांनी गाव सोडले, शेती सोडली, त्यांचे जीवनमान उंचावले. जे शेतीत अडकून पडले त्यांची परिस्थिती बिकट झाली. हे दिसून येते. याचा पुरोगामी पक्ष-संघटना कधी विचार करणार आहेत? शेतकरीविरोधी कायदे अस्तित्वात असताना कोणाला आजिवीकेसाठी (आजिवीका हा शब्द महत्वाचा आहे) चार दोन एकर कोरडवाहू जमीन मिळवून देणे म्हणजे त्याला आत्महत्येकडे ढकलणे आहे. हे लक्षात घ्यावे, असंही अमर हबीब म्हणतात.

शेतीक्षेत्रात उदारीकरण आलेच नाही. सीलिंग, जमीन अधिग्रहण आणि अत्यावश्यक वस्तूंचा कायदा हे उदारीकरण विरोधी कायदे आजही अस्तित्वात आहेत. शेतीत उदारीकरण आले नाही. त्यामुळे शेती क्षेत्राची प्रचंड हानी झाली आहे, असं मत हबीब यांनी मांडले.



बडा शेतकरी कोण? : ज्याचे उत्पन्नाचे मुख्य साधन शेती आहे तो शेतकरी, ही शेतकऱ्यांची व्याख्या आहे. नोकरदार, राजकारणी, व्यापारी अशा लोकांना जे शेतकरी समजतात, त्यांच्या बुद्धीची कीव करावी वाटते. इनकम टॅक्स भरणाऱ्यांना त्यांच्याकडे सातबारा आहे म्हणून त्यांच्या कर्जाची माफी देणे चुकीचे आहे असे मत पहिल्यांदा किसानपुत्र आंदोलनाने जाहीरपणे मांडले होते. नाही. ते ५० ते ७० टक्के जनतेची उत्पादकता मारणारे ठरते. ते व्यक्तिस्वातंत्र्याच्या विरोधात आहे. सरकारी नोकरीपुरता असा नियम केल्यास माझी हरकत नाही. आपल्या देशात सरकारी नोकऱ्या हेच एकमेव रोजगाराचे साधन मानल्यामुळे व ते तसे बनल्यामुळे अनेक तिढे निर्माण झाले आहेत. सरकारी नोकऱ्यातले आकर्षण कमी होणे गरजेचे आहे. बुध्दी श्रम व शरीरश्रम करणाऱ्याला सारखेच वेतन दिले तर शेतकरी आत्महत्या थांबतील का?

हा फरक बुद्धी आणि श्रम असा नसून राजाश्रीत व प्रजा (रयत) असा आहे. ज्यांना सरकारी संरक्षण मिळाले त्यांची भरभराट व ज्यांना मिळाले नाही. त्यांची परिस्थिती बिकट, त्यातही शेतकऱ्यांची लूट. असे हे समीकरण आहे. सत्तेचे संरक्षण नेहमी ऐतखाऊ लोकांना मिळते. सर्जकांचे हाल होतात. बौद्धिक श्रम आणि शरीर श्रम एवढ्या मर्यादेत पाहणे चुकीचे आहे. सीलिंग कायदा शेतकरीविरोधी आहेच, यात शंकाच नाही. कारण सीलिंगमुळे जमीनीचे तुकडे झाले व आज एवढी कमी धारणा (होल्डिंग) झाली आहे की त्यात शेतकरी कुटुंबाची उपजीविका सुद्धा भागत नाही. सीलिंग आहे म्हणून शेती क्षेत्रात भांडवल गुंतवणूक होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रगती करता येत नाही. सीलींगचा कायदा भारतीय घटनाविरोधी आहे. पक्षपात करणारा आहे. शेतजमिनीचे विखंडन होण्यास हा कायदा जबाबदार आहे. हा कायदा घटनेच्या परिशिष्ट ९ मध्ये टाकला आहे म्हणून तो न्यायालयीन कक्षेत येत नाही. १९७४ च्या नंतरचे कायदे सुप्रीम कोर्ट विचारात घेऊ शकते असा एक निकाल आला आहे. पण दुर्दैवाने हा कायदा १९६० मध्ये आला व तेव्हाच समाविष्ट केला गेला. लोकसभेत ठरले तर हा कायदा परिशिष्ट ९ मधून बाहेर निघू शकतो. लोकसभा आणि विधानसभा हे राजकीय अड्डे आहेत. त्यांच्यासाठी शेतकरी हा विषय नगण्य आहे. शेतकरी गुलाम आणि विखुरलेले राहिले तरच त्यांना राजकीय फायदा होतो म्हणून ते हा कायदा रद्द करत नाहीत. हा कायदा रद्द करणारे लोक निवडून येऊ शकत नाहीत. कारण निवडणुकीचा खेळ ते खेळू शकत नाहीत. एकच पर्याय आहे तो म्हणजे या विषयी आवाज उठवीत राहणे, हा आवाज जेंव्हा मोठा होजल तेंव्हा त्यांना हे कायदे रद्द करणे भाग पडेल. मला इतरांशी काही देणे घेणे नाही. मी शेतकऱ्यांना आणि किसानपुत्रांना उद्देशून लिहितो, बोलतो. मला माझी वाट चालायची आहे. शेतकऱ्यांसाठी पर्यायाने देशासाठी 'शेतकरी विरोधी कायदे रद्द करणे' हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. तो मुद्दा मी हातात घेतला आहे.अल्पभूधारक शेतकऱ्यांचे आत्महत्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. ज्यामुळे माणसे मरू लागली तो मुद्दा कमी महत्वाचा कसा असेल? ज्यांना शेती करायची नाही, त्यांना शेती सोडता येत नाही व ज्यांना शेती करायची आहे, त्यांना धड करू दिली जात नाही. सीलिंगचा कायदा उठल्याने ही कोंडी फुटेल.नाही. हा 'शेतकरी स्वातंत्र्याचा' कार्यक्रम आहे. शेतक-यांच्या हाता-पायातील कायद्यांच्या बेड्या तोडण्यासाठी केल्या जाणाऱ्या आंदोलनाचे नाव किसानपुत्र आंदोलन आहे. याच्या नावातही संघटना हा शब्द नाही. कोणीही हा कार्यक्रम राबवू शकतो. आमच्याकडे कोणीही पदाधिकारी नाही. ना कोणी अध्यक्ष, ना सचिव ना कोषाध्यक्ष आहे. प्रत्येक किसानपुत्र हाच आमचा नेता आहे, सरसेनापती आहे, सैनिक आहे, असंही अमर हबीब म्हणाले.

## निर्माल्यापासून घरच्या घरी खतनिर्मिती

आपल्याकडे विविध सणांमध्ये सजावटीसाठी तसेच पूजेसाठी पाने, फुले आणि वनस्पतींचे इतर भाग अर्पण केले जातात. विशेषतः श्रावण महिन्यात आणि हरितालिका, गौरी-गणपतीमध्ये घरामध्ये बरेच निर्माल्य गोळा होते. पूजा केल्यानंतर दररोज नवीन निर्माल्य साठत जाते. या निर्माल्याची विल्हेवाट योग्यरीत्या कशी लावावी, अशा प्रश्न बऱ्याच वेळा पडतो. काही वेळा नद्या किंवा वाहत्या पाण्यामध्ये निर्माल्य सोडले जाते. त्यामुळे पाणी प्रदूषणात वाढ होते. शहरांतील गटारांचे पाणी नद्या, नाल्यांमध्ये सोडले जाते. त्यामुळे हे पाणी आधीच दूषित झालेले असते. अशा पाण्यात निर्माल्य सोडल्यास त्याच्या पावित्र्याचा अवमान होतो. शिवाय प्रदूषणातही भर पडते. अशावेळी हे निर्माल्य साठवून त्याची योग्यप्रकारे वर्गीकरण करून त्याचा कंपोस्ट निर्मितीसाठी वापर करता येतो. घरच्या घरी अगदी सोप्या पद्धतीने निर्माल्यापासून कंपोस्ट निर्मिती करता येते. या निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास पर्यावरणास फायद्याचे ठरेल.

निर्माल्य म्हणजे काय?

विविध सणांच्या कालावधीत देवदेवतांना फुले, हार, बेलपत्र, दूर्वा, रुई इत्यादी वनस्पती अर्पण केल्या जातात. दररोज पूजेवेळी ही आदल्या दिवशीची पाने, फुले, वनस्पती काढून त्या जागी नवीन पाने, फुले अर्पण केले जातात. याला निर्माल्य म्हणतात. असे दररोज गोळा झालेले निर्माल्य साठवून ठेवावे. याशिवाय सजावटीसाठी विविध प्रकारचे थर्माकोल, प्लॅस्टिक इत्यादी साहित्य, तसेच कृत्रिम फुले, मणी, तोरण इत्यादींचा वापर केला जातो.

निर्माल्याचे वर्गीकरण : पूजेसाठी वापरलेली पाने, फुले, वनस्पती तसेच सजावटीचे कृत्रिम साहित्य निर्माल्यामध्ये एकत्रित करून टाकून दिले जाते. हे निर्माल्य नदी किंवा वाहते पाणी असलेल्या ठिकाणी टाकले जाते. त्यामुळे पाणी प्रदूषण होण्याचा धोका असतो. त्यासाठी निर्माल्याच्या साहित्याचे व्यवस्थित वर्गीकरण करणे आवश्यक आहे. वर्गीकरण करताना निर्माल्यातील कृत्रिम आणि अनैसर्गिक वस्तू आणि इतर साहित्य यांचे वेगळे वर्गीकरण करावे. फुलांचे वर्गीकरण करताना त्यांचा रंग आणि आकार यानुसार वेगळे वर्गीकरण करावे. पूजेसाठी वापरलेल्या हारांमधील पाने, धागे, चमकी आणि इतर सजावटीचे साहित्य वेगळे काढावे. बऱ्याच वेळा निर्माल्यामध्ये रांगोळी देखील मिसळली जाते. ती शक्य असल्यास वेगळी करावी. कारण रांगोळीमध्ये कृत्रिम रंगांचा वापर केला जातो. त्यामुळे प्रदूषण होण्याचा धोका अधिक असतो. साहित्य : मातीची कुंडी किंवा प्लॅस्टिक किंवा रंगाचे डबे, विटांचे तुकडे किंवा नारळाच्या दश्या, निर्माल्य, माती, प्लॅस्टिक हातमोजे.कृती : प्रथम डबा किंवा मातीची कुंडी घ्यावी. प्लॅस्टिक किंवा रंगाचे डबे घेतल्यास त्यांच्या बुडाशी बारीक छिद्र पाडून घ्यावे. मातीच्या कुंडीला छिद्र पाडण्याची गरज नाही. त्यानंतर कुंडीच्या बुडाशी दोन ते तीन इंच विटांचे तुकडे किंवा नारळाच्या दश्या (शेंड्या) टाकून घ्याव्यात.

## केळीवरील कुकुंबर मोझॅक रोगाचे नियंत्रण

मागील काही वर्षांपासून केळी लागवड क्षेत्रामध्ये कुकुंबर मोझॅक (सीएमव्ही) या विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. स्थानिक भाषेत या रोगास 'हरण्या' रोग असे म्हणतात. हा विषाणूजन्य रोग असून याच्या नियंत्रणासाठी थेट उपाय नाहीत.

या रोगाचा प्रसार मावा किडीमार्फत होतो. या रोगाची सुमारे ९०० पेक्षा अधिक यजमान विके आहे. त्यामुळे या पिकांची केळी लागवड क्षेत्राच्या जवळ लागवड असल्यास रोगाची तीव्रता अधिक वाढते. या रोगाचा प्रादुर्भाव प्रामुख्याने जुलै व ऑगस्ट महिन्यात लागवड केलेल्या केळी बागांमध्ये अधिक दिसून येतो. मे व जून लागवडीमध्ये रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत नाही. सद्यःस्थितीचा विचार केल्यास मे-जून लागवडीमध्ये काही ठिकाणी अगदी नगण्य प्रादुर्भाव आहे. मात्र उशिराने लागवड केलेल्या (जुलै-ऑगस्ट) बागांमध्ये प्रादुर्भाव जास्त दिसून येत आहे. या विषाणूजन्य रोगाचा प्रसार मुख्यतः मावा किडीमार्फत होत असल्याने कीड नियंत्रणावर भर देणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरून रोगाचा प्रादुर्भाव टाळणे शक्य होईल. सुरुवातीस कोवळ्या पानांच्या शिरांतील हरितद्रव्य लोप पावते. त्यामुळे पानांवर पिवळसर पट्टे दिसतात. हे पट्टे अर्धवट आकाराचे किंवा संपूर्ण पानांवर आढळून येतात. कालांतराने पानांच्या शिरांमधील भाग काळपट पडून तेथील उती मृत पावतात. पाने फाटतात, पानांचा पृष्ठभाग आकसतो. कडा वाकड्या होऊन पाने जवळ येतात. शिरा ताठर होऊन संपूर्ण



पान कडक होते. रोगाच्या अति तीव्र अवस्थेत पोंग्याजवळील पाने पिवळे पडून पोंगा सडतो. झाडाची वाढ खुंटते.

अनुकूल घटक : सततचा पाऊस, ढगाळ वातावरण. कमी झालेले तापमान व वाढलेली आर्द्रता. रोगग्रस्त लागवड साहित्याचा वापर. केळी लागवड परिसरात काकडीवर्गीय पिके, टोमॅटो, मिरची, वांगी, चवळी, सोयाबीन, मूग, मटकी या पिकांची लागवड.

तणांचा प्रादुर्भाव : पीक फेरपालटीचा अभाव.

व्यवस्थापन : विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर त्याच्या नियंत्रणासाठी कोणतेही ठोस उपाय करता येत नाही. तथापि रोगप्रसार रोखण्यासाठी खालील उपाययोजनांचा अवलंब करावा. प्रादुर्भावग्रस्त झाडे मुळासकट उपटून बागेपासून दूरवर नेऊन जाळून नष्ट करावीत. बागेचे दर ४ ते ५ दिवसांनी २ ते ३ वेळा निरीक्षण करावे. बागेतील तसेच बांधावरील सर्व प्रकारची तणे काढून स्वच्छता राखावी. बागेत चिवईची भाजी ठेवू नये. केळी बागेत काकडीवर्गीय तसेच टोमॅटो, मिरची, वांगी या पिकांची लागवड करू नये.

कीड नियंत्रण : रोगाचा प्रसार मावा किडीमार्फत होतो. कीड नियंत्रणासाठी,

(फवारणी : प्रति लिटर पाणी) डायमेथोएट (३० ईसी) २ मिलि किंवा थायामेथोक्झाम (२५ डब्ल्यूजी) ०.२ ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रीड (१७.८ एसएल) ०.५ मिलि

## नारळावरील सोंड्या भुंगा किडीचे व्यवस्थापन

नारळ हे कोकणातील महत्त्वाचे बागायती फळपीक आहे. जगातील नारळ पिकविणाऱ्या ९३ देशांतील एकूण नारळ पिकाखालील क्षेत्र १२२ लाख हेक्टर असून, उत्पादन ६५,६७१ लाख नारळ एवढे आहेत. भारताचे नारळ लागवडीखालील क्षेत्र २१.९९ लाख हेक्टर आहे व उत्पादन २०,७३१ लाख नारळ एवढे आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये नारळ लागवड ४३,१६० हेक्टरवर (देशाच्या १.३३ टक्के) असून, उत्पादन २२.३६ लाख नारळ (१.२६ टक्के) इतके आहे. अशा महत्त्वपूर्ण पिकाला नुकसान पोहोचविणाऱ्या किडीमध्ये सोंड्या भुंगा ही एक महत्त्वाची कीड आहे.


सोंड्या भुंगा-आढळ : कोकणात सर्वत्र. मात्र दुर्लक्षित बागा आणि नवीन लागवड केलेल्या नारळ बागांमध्ये जास्त प्रमाण. हा भुंगा गेंड्या भुंग्यापेक्षाही जास्त हानिकारक आहे. वेळीच प्रादुर्भावग्रस्त झाडे न ओळखता आल्यास व उपाययोजना न केल्यास नारळ, तेलताड, खजूर, शिंदी, ताड इ. नारळ वर्गीय झाडे मरण्याची शक्यता जास्त असते. कोणत्याही वयोगटातील झाडांना सोंड्या भुंग्याचा प्रादुर्भाव होत असला, तरी ४ ते १५ वयोगटांतील नारळ झाडे या किडीला जास्त बळी पडत असल्याचे आढळले आहे.

किडीच्या जीवन अवस्था : भुंगा : तांबूस तपकिरी रंगाचा. डोक्याच्या पुढील बाजूस ठळकपणे दिसणारा लांब व सरळ वाढलेला एक सोंडेसारखा भाग असतो. थोडक्यात, तांदळात सापडणाऱ्या टोके किडीची मोठी आवृत्तीच होय. भुंगा जवळपास ३५ मि.मी. लांब व १२ ते १३ मि.मी. रुंद असतो. भुंगा सुमारे ३ ते ४ महिने जगतो.

अंडी : मादी आपल्या टोकदार सोंडेने नारळ झाडाच्या खोडामध्ये छिद्र पाडून त्यामध्ये किंवा गेंड्या भुंग्याने पाडलेल्या छिद्रात किंवा अन्य प्रकाराने झालेल्या जखमेत सुमारे ३०० अंडी घालते. २ ते ३ दिवसांत अंडी उबल्यानंतर त्यातून पिवळसर रंगाच्या अळ्या बाहेर पडतात.

अळी : सुरुवातीस ही अळी २.६ ते २.८ मि.मी. लांब असते. तिला पाय नसतात. तिचे





डोके तांबडे असते. अळी खोड पोखरून त्यातील मऊ भागावर आपली उपजीविका करते. भुंग्याची पूर्ण वाढलेली अळी फिक्कट पिवळसर, अंगाने मध्यभागी फुगीर व दोन्ही बाजूंस निमुळती असून, तिच्या कातडीच्या घड्या स्पष्ट दिसतात. ती ४० ते ५० मि.मी. लांब व १२ ते १५ मि.मी. रुंद असते. अळीचे दोन्ही जबडे मजबूत आणि कणखर असल्याने ती नारळ झाडाच्या खोडाला सहजासहजी छिद्र पाडू शकते. अळीची वाढ ३६ ते ७८ दिवसांत पूर्ण होते. कोष : पूर्ण वाढलेली अळी खोडातील तंतूच्या कोष करून, नारळाच्या खोडामध्येच कोषावस्थेत जाते. कोषावस्थेचा कालावधी १२ ते ३५ दिवसांचा असतो. किडीचा जीवनक्रम १०० ते १७० दिवसांचा असतो.नुकसानीची पद्धत व लक्षणे : पूर्ण वाढलेले भुंगे खऱ्या अर्थाने फारसे नुकसान करत नाहीत. मात्र या किडीची अळी अवस्था माडाचे जास्त नुकसान करते. अंड्यातून बाहेर पडलेल्या अळी खोडाला छिद्र पाडून आत प्रवेश करते. अळी खादाड असून, ती झाडाच्या खोडातील तंतू व मऊ भाग कुरतडून खात असते. त्यामुळे झाड आतून पूर्णपणे पोखरले जाते. सोंड्या भुंग्याचा प्रादुर्भाव झाडाच्या जमिनीजवळील भागावरच प्रामुख्याने दिसून येतो. अळी खोड खालून वर पोखरत जाते. प्रादुर्भावग्रस्त झाडाच्या झावळ्या पिवळसर निस्तेज दिसतात. झाडाची वाढ खुंटते. खोड जास्त पोखरले गेल्यास असे झाड वाऱ्यामुळे कोलमडते. बऱ्याच वेळा नारळाच्या झाडास या किडीचा प्रादुर्भाव झाला आहे, हे ओळखण्यात उशीर होतो. हे टाळण्यासाठी पुढील लक्षणांवर सातत्याने लक्ष ठेवावे. झाडाच्या खोडावर तांबूस तपकिरी रंगाचा स्राव दिसून येतो. हा स्राव नंतर ओघळल्यासारखा दिसतो. स्राव हवेच्या संपर्कामुळे काळपट तपकिरी होतो. खोडावर बारीकसारीक छिद्रे दिसून येतात. त्यातून ताजा भुस्सा बाहेर येतो. खोडाला सकाळी किंवा सायंकाळच्या शांत वेळी कान लावल्यास 'करकर' असा आवाज येतो. या भुंग्याचा प्रादुर्भाव झाडाच्या शेंड्याकडील भागावरही होतो. अळ्या झाडाच्या कोंबात राहून आतील भाग खातात, त्यामुळे वाढणारी सुई निस्तेज दिसते. झावळ्या निस्तेज दिसतात. कालांतराने कोंब आणि झावळ्या सुकून झाड दगावते.

एकात्मिक कीड व्यवस्थापन : सोंड्या भुंग्याचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून झाडावर जखमा करणे, झाडावर चढण्यासाठी खोडावर खाचा पाडणे या गोष्टी टाळणे आवश्यक आहे. अशा जखमांवर सोंड्या भुंग्याची मादी अंडी घालते आणि माडाला उपद्रव सुरू होतो. झाडाच्या खालील बाजूकडील हिरव्या झावळ्या तोडू नयेत आवश्यकता असेल तर त्या खोडापासून १२० सेंमी. अंतरावर तोडून त्यावर डांबर फासावे. झाडाच्या खोडावर खोलवर केलेल्या जखमा किंवा गेंड्या भुंग्यानी पाडलेली छिद्रे नंतर भरून येत नाहीत. अशी छिद्रे निमपेंड व वाळू यांच्या समप्रमाणात केलेल्या मिश्रणाने वेळोवेळी भरून घ्यावीत. सोंड्या भुंग्यामुळे मेलेले झाड त्वरित बागेतून काढून नष्ट करावे. सोंड्या भुंगे आकर्षित करण्यासाठी फरोलूर या गंध सापळ्याचा वापर करावा. एक ते दोन सापळे प्रति हेक्टर पुरेसे आहेत. या गंधाला नर अणि मादी भुंगे आकर्षित होतात. या गंधाचा परिणाम त्याच्या गुणवत्ता आणि प्रमाणकानुसार २ ते ५ महिन्यांपर्यंत टिकतो. सापळ्याची परिणामकारकता वाढविण्यासाठी सापळ्यामध्ये अननस फळाचे छोटे तुकडे किंवा नारळ फळाचा रस टाकावा. हे सापळे झाडाच्या खोडावर न लावता नारळ बागेमध्ये खांब उभारून त्यावर २.५ ते ३ मीटर उंचीवर लावावेत. तसेच सापळ्याच्या आजूबाजूच्या ८ ते १० झाडांवर भुंग्याच्या प्रादुर्भावासाठी लक्ष ठेवावे. प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर नसेल तर खोडावर असणाऱ्या छिद्रातून किडीच्या सर्व अवस्था धारदार कोयत्याने आणि तारेच्या हुकाने काढून माराव्यात. त्या ठिकाणी डांबर लावावे. प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्यास, इमिडाक्लोप्रिड (१७.८ एस.एल.) १.५ मि.लि किंवा स्पिनोसॅड (४५ एस.सी.) ०.५ मि.लि. प्रति लिटर पाणी किंवा डायमेथोएट (३० टक्के प्रवाही) २० मि.लि. समप्रमाणात पाणी या प्रमाणे तयार केलेले द्रावण नरसाळ्याच्या साह्याने सर्वांत वर असलेल्या छिद्रातून खोडात सोडावे. यासाठी सर्वप्रथम खोडावरील छिद्रांचे निरीक्षण करून, सर्वांत वर असलेल्या छिद्राच्या एक फूट वर इतक्या उंचीवर सुताराकडील गिरमिटच्या साह्याने खोडाला १० सेंमी. तिरपे छिद्र पाडावे. त्यामध्ये नरसाळ्याच्या साह्याने वरील द्रावण सोडावे. नरसाळे त्वरित न काढता १० ते १५ मिनिटांपर्यंत तसेच ठेवावे. सर्व द्रावण झाडाच्या खोडात झिरपेल असे पाहावे. ही प्रक्रिया करण्यापूर्वी खोडातील अन्य सर्व छिद्रे मातीने बंद करावीत. जर प्रादुर्भाव शेंड्यातून असेल तर हेच द्रावण हळूहळू शेंड्याकडील छिद्रातून ओतावे. कीटकनाशक हळूहळू खाली येऊन खोडातील किडींचा नाश होतो. शिफारशीप्रमाणे खत मात्रा द्यावी. नारळ बागेमध्ये प्रादुर्भाव होऊ नये म्हणून निमपेंड १०० ग्रॅम अधिक हिंग भुकटी ५ ग्रॅम यांचे मलम करून माडाच्या खोडावर लावावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८६७ : सोविएत रशियाला ७२ लाख डॉलर देऊन अमेरिकेने अलास्का हा प्रांत खरेदी करुन ताब्यात घेतला.
१८७९ : थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना
१९०६ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन'ची स्थापना केली.
१९१९ : राम गणेश गडकरी लिखित 'संगीत भावबंधन' या नाटकाचा पहिला प्रयोग दीनानाथ मंगेशकरांच्या 'बळवंत संगीत नाटक मंडळी'ने केला.
१९२२ : ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कार्पोरेशनची स्थापना
१९६७ : सोविएत रशियाचे 'व्हेनेरा-४' हे अंतराळयान शुक्रावर उतरले.
१९७२ : प्रथम बहुउद्देशीय हेलिकॉप्टर एस. ए. ३१५ ची चाचणी बैंगलोर येथे घेण्यात आली.
१९७७ : २०६०-चिरॉन हा अंतरिक्षातील सर्वात दूरवरील लघुग्रह शोधण्यात आला.
२००२ : कसोटी व एकदिवसीय क्रिकेट सामन्यात वीस हजार धावा करणारा सचिन तेंडुलकर पहिला क्रिकेटपटू ठरला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८०४ : मोंगकुट ऊर्फ राम (चौथा) थायलंडचा राजा (मृत्यू: १ आक्टोबर १८६८)
१८६१ : 'भारताचार्य' चिंतामणराव वैद्य न्यायाधीश, कायदेपंडित, लेखक, आणि इंग्रजी व संस्कृतचे जाणकार. महाभारताच्या मराठी भाषांतराचा समारोप म्हणून त्यांनी लिहिलेल्या 'महाभारताचा उपसंहार' या ग्रंथामुळे लोकमान्यांनी त्यांना 'भारताचार्य' ही पदवी दिली. (मृत्यू: २० एप्रिल १९३८)
१९२५ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार तसचं, पद्मभूषण व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय भारतीय नाट्य दिग्दर्शक आणि नाट्य शिक्षक तसचं, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचे संचालक इब्राहीम अलकाजी यांचा जन्मदिन.
१९२५ : इब्राहिम अल्काझी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचे संचालक
१९३९ : ली हार्वे ओस्वाल्ड राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडीचा मारेकरी (मृत्यू: २४ नोव्हेंबर १९६३)
१९५० : ओम पुरी अभिनेता
१९५६ : मार्टिना नवरातिलोव्हा झेकोस्लोव्हाकियाची लॉन टेनिस खेळाडू
१९६५ : इस्लामिक रिसर्च फाउंडेशन (आयआरएफ) चे संस्थापक आणि अध्यक्ष झाकीर नाईक यांचा जन्म.
१९७४ : भारतीय लेखक अमिश त्रिपाठी यांचा जन्म.
१९७७ : भारतीय अभिनेता कुणाल कपूर यांचा जन्म.
१९८४ : भारतीय अभिनेत्री फ्रीडा पिंटो यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७१ : चार्ल्स बॅबेज इंग्लिश गणितज्ञ, संशोधक, अभियंता आणि तत्त्वज्ञ, पहिल्या यांत्रिकी संगणकाचा जनक (जन्म: २६ डिसेंबर १७९१)
१९०९ : लालमोहन घोष देशभक्त, काँग्रेसचे १६ वे अध्यक्ष, भारताच्या विविध राजकीय हक्कांकरिता त्यांनी इंग्लंडमधील ब्रिटिश जनतेत प्रचार केला. (जन्म: १७ डिसेंबर १८४९ कलकत्ता)
१९३१ : थॉमस अल्वा एडिसन अमेरिकन संशोधक आणि उद्योजक (जन्म: ११ फेब्रुवारी १८४७)
१९५१ : हिराबाई पेडणेकर पहिल्या स्त्री नाटककार, गायिका, संगीतकार (जन्म: २२ नोव्हेंबर १८८५)
१९७६ : भारतीय कवी आणि लेखक विश्वनाथ सत्यनारायण यांचे निधन. (जन्म: १० सप्टेंबर १८९५)
१९८३ : विजय मांजरेकर क्रिकेटपटू (जन्म: २६ सप्टेंबर १९३१)
१९८७ : वसंतराव तुळपुळे कम्युनिस्ट कार्यकर्ते. कार्ल मार्क्सच्या 'दास कापिटाल' या ग्रंथाचा त्यांनी मराठीत अनुवाद केला होता. (जन्म:)
१९९३ : मंदाकिनी विश्वनाथ आठवले भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या बालअभिनेत्री. दादासाहेब फाळके यांच्या त्या कन्या होत. त्यांनी फाळके यांच्या 'कालियामर्दन' या मूकपटात काम केले होते. (जन्म:)
१९९५ : ई. महमद छायालेखक (शेजारी, दहा वाजता, आसमान, चोरीचा मामला) (जन्म:)
१९९६ : भारतातील प्रमुख क्रांतिकारक रामकृष्ण खात्री यांचे निधन.
२००४ : भारतातील कुख्यात चंदनवादी तस्करी व नक्षलवादी वीरप्पन यांना ठार मारण्यात आले.
२००४ : वीरप्पन चंदन तस्कर (जन्म: १८ जानेवारी १९५२)

# उर्दू घर उभारून बाबा सिद्दीकींचे नाव देणार : डॉ.योगेश क्षीरसागर

**बीडमध्ये जुनी ईदगाह मैदानावर १ कोटींच्या कामाचे उद्घाटन** | **ख्रिश्चन समाजाच्या स्मशानभूमीसाठी दिला ५० लाखांचा निधी** | **नाळवंडीत ईदगाह मैदानावर २७.५० लाखातून सुशोभीकरण**

बीड । प्रतिनिधी

दि.१५ : प्रलंबित असलेला उर्दू घर व मुस्लिम मुलींच्या वसतिगृहाचा प्रश्न येत्या वर्षभरात सोडविला जाईल. त्यासाठी शासन दरबारी सतत पाठपुरावा सुरू आहे. उर्दू घर उभारून त्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते बाबा सिद्दीकी यांचे नाव देण्याचा ठराव मी मुस्लिम बांधवांसमोर मांडला. या ठरावास सर्वांनी एकमुखाने पाठिंबा देत होकार दिला आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. बीड शहरातील नाळवंडी नाका भागातील जुनी ईदगाह मैदानाचे सुशोभीकरण, बांधकाम यासाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून महाराष्ट्र सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) या योजनेतून १ कोटींचा निधी मंजूर केला होता. या कामाचे भूमिपूजन सोमवारी (दि.१४)



डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. हे केवळ बोलण्यापुरते मर्यादित न ठेवता अजितदादा व धनुभाऊ यांच्या माध्यमातून कृतीतून सिद्ध करून दाखविले आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासह अल्पसंख्यांकाच्या विविध योजनांसाठी कोट्यवधींची तरतूद महायुती सरकारने केली आहे. त्यामुळे समाजाचे खरे हितचिंतक कोण आहेत, हे ओळखण्याची गरज आहे. उर्दू घरासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. येत्या वर्षभरात उर्दू घर उभारून त्याला दिवंगत नेते बाबा सिद्दीकी यांचे नाव दिले जाईल. तसेच, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मुस्लिम मुलींच्या वसतिगृहाचाही प्रश्न सोडविला जाईल, अशी ग्वाही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. याप्रसंगी मुफ्ती मोहीयोद्दीन साहाब, मौलाना मुख्तार साहब, मौलाना सद्दर, हाफिज नदीर, हाफेज नजमुद्दीन साहाब यांच्यासह माजी नगरसेवक, मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित नागरिक व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ख्रिश्चन स्मशानभूमीसाठी दिला ५० लाखांचा निधी

महाराष्ट्र अल्पसंख्यांक विभागाच्या योजनेतून बीड शहरातील अंकुश नगर भागातील ईडन गार्डन (ख्रिश्चन स्मशानभूमी) येथे ५० लक्ष रुपयांचा निधी दिला असून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी ख्रिश्चन धर्मगुरू चार्ल्स सोनवणे, नगरसेवक भीमराव वाघचौरे, गणेश वाघमारे, मरियन रेड्डी, आशिष शिंदे , किशोर पाटील, मथ्यू जोसेफ, पास्टर संजय गायकवाड, पा.अमृत सोनावणे, गजानन जवकर, बिपिन देशमुख, सुशांत सत्राळकर, प्रेमविजय भागतिलक आदी उपस्थित होते.

## नाळवंडीत २७.५० लाखांच्या कामाचे उद्घाटन

बीड तालुक्यातील नाळवंडी येथे महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागांतर्गत मुस्लिम बांधवांसाठी ईदगाह परिसर येथे २७.५० लाख रुपयांच्या निधीतून सुशोभीकरण व बांधकाम होणार आहे. या कामाचे भूमिपूजन डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी जि.प.सदस्य, सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, उपसरपंच बंडू म्हेत्रे, ग्रा.पं.सदस्य गुलाब, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, शुभम कातांगळे, अरुण तंबरे, गणेश राऊत, गोरख काळे, वजीर, प्रदीप गायकवाड, खालेद, फारुख भाई, लल्लू खान, संजय काळे, गणी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डिजिटल मीडियाच्या प्रतिनिधींना वृत्तसंकलनासाठी ओळखपत्र द्या

**एस.एम.देशमुख यांचे निवडणूक आयोगाला पत्र**

मुंबई। प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदान व मतमोजणीचे वृत्तसंकलन करण्यासाठी मुद्रीत व इलेक्ट्रानिक मीडियाच्या प्रतिनिधींसोबत डिजिटल मीडियाच्या प्रतिनिधींना निवडणूक आयोगाने ओळखपत्र (प्रधिकारपत्र) द्यावे, अशी मागणी मराठी पत्रकार परिषद व डिजिटल मीडिया परिषदेच्यावतीने भारत निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे. याबाबत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांना मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी ई-मेलद्वारे पत्र पाठवले आहे. एस.एम.देशमुख यांनी मुख्य निवडणूक आयुक्त यांना पाठवलेल्या पत्रात म्हंटले आहे की, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ची घोषणा मुख्य निवडणूक आयुक्त या नात्याने आपण १५ ऑक्टोबर २०२४ रोजी पत्रकार परिषद घेऊन केली आहे. त्यानुसार महाराष्ट्रात २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे, आणि २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीत जास्तीतजास्त मतदारांनी मतदान करावे, यासाठी निवडणूक आयोगाकडून करण्यात येणारे प्रयत्न कौतुकास्पद आहेत. मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी निवडणूक आयोगाकडून मोठ्या प्रमाणात सोशल मीडिया वापरला जातो. तसेच मुद्रीत, इलेक्ट्रानिक, डिजिटल मीडियाचे प्रतिनिधी देखील यासाठी प्रयत्न करीत असतात,' असे देशमुख यांनी पत्रात म्हंटले आहे.



'निवडणूक आयोगाच्या मतदारांसाठी उपयुक्त असणाऱ्या बातम्या ग्रामीण भागातील मतदारांपर्यंत पोहोचवण्यासाठी मुद्रीत, इलेक्ट्रानिक मीडिया सोबतच डिजिटल मीडियाची भूमिका खूपच महत्त्वपूर्ण आहे. परंतु विधानसभा निवडणुकीत वृत्तांकन करण्यासाठी निवडणूक आयोगाकडून प्रधिकारपत्रे देण्यात येते, तेव्हा केवळ मुद्रीत व इलेक्ट्रानिक मीडियाच्या प्रतिनिधींना ते दिले जातात. डिजिटल मीडियाच्या प्रतिनिधींना मतदान आणि मतमोजणी केंद्राच्या ठिकाणी वृत्तांकनासाठी प्रधिकारपत्र दिले जात नाही. त्यामुळे अनेकदा इच्छा असूनही निवडणूक विषयी आवश्यक माहिती मतदारांपर्यंत पोहोचवण्यास डिजिटल मीडिया प्रतिनिधींना अडचणी येतात. निवडणूक आयोग स्वतः मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी सोशल मीडिया, यु ट्यूब यासारखी माध्यमे वापरत असल्याने डिजिटल मीडियाची ताकद नेमकी किती आहे, याची कल्पना निवडणूक आयोगाला आहेच,' असेही देशमुख यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. 'यासर्व गोष्टींचा विचार करून कृपया महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मुद्रीत, इलेक्ट्रानिक मीडिया सोबतच डिजिटल मीडिया (न्यूज पोर्टल, युट्यूब न्यूज चॅनल) यांनाही वृत्तसंकलन करण्यास ओळखपत्र (प्रधिकारपत्र) द्यावे, अशी मागणी मराठी पत्रकार परिषद, मुंबई आणि या संघटनेशी संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषद यांच्या वतीने करण्यात येत असून आपण आमच्या मागणीचा विचार करून योग्य त्या सूचना महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा निवडणूक अधिकारी यांना द्याव्यात,' अशी मागणी देशमुख यांनी केली आहे.

# गोमळवाडा येथील विकास कामाचे महंत भानुदास म.शास्त्री यांचे हस्ते भुमिपुजन

शिरूर । प्रतिनिधी

तालुक्यातील गोमळवाडा येथे श्रीक्षेत्र मसोबा देवस्थानच्या विकासाठी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या सहकार्यातुन जिल्हा नियोनमधुन तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत १० लक्ष रूपये निधी मंजूर करण्यात आला असून या कामाचे भुमिपुजन दसऱ्याच्या शुभमुहुर्तावर श्रीराम संस्थानचे महंत भानुदास महाराज शास्त्री यांच्या शुभहस्ते व सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांच्या प्रमुख उपस्थितीमधे संपन्न झाले.



श्रीक्षेत्र मसोबा देवस्थानचा विकास झाला पाहीजे यासाठी सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे मागणी केली होती. या मागणीला यश आले आहे. विशेष म्हणजे आजीनाथ गवळी यांचेकडे कुठलेही पद नसतांना विकासनिधीसाठी प्रयत्न करून निधी मंजूर झाल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करून त्यांचे कौतुक केले आहे. तर यावेळी या कार्यक्रमासाठी महंत भानुदस म.शास्त्री, सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी, बबनराव सुरे यांचेसह भगवान म.बारगजे, एकनाथ पवार, पत्रकार प्रकाश साळवे, काकासाहेब जेधे, गंगाधर पाखरे, अनिलदेवा कुलकर्णी, मा.उप.सरपंच गणेश कातखडे, व्हा.चे.बबन वीर, पो.पा.ज्ञानोबा काकडे, मारूती गवळी, बाबासाहेब साळवे, दत्तु सुरे, विलास पवार, कृष्णा बारगजे, मोहन बनकर, एकनाथ गवळी, आश्रुबा गर्जे, हौसराव पवार, मधुकर वीर, भागवत गारूडकर, विट्ठल बारगजे, संदीपान कातखडे, विलास कातखडे, कचरू कातखडे, भगवान कदम, पप्पु माळी, बाबासाहेब चौधरी, पुजारी ज्ञानेश्वर कातखडे आदींसह ग्रामस्थ यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# खा.सोनवणे यांनी पत्रकारला संरक्षण देण्यासाठी दिले पत्र

## रोहन गलांडे यांच्या जिवीताला धोका

केज । प्रतिनिधी

बीडजिल्हाचे खासदार बजरंग सोनवणे खासदार असुन सुद्धा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभाला धंका लागु नये यांची सुध्दा काळजी खासदार बजरंग सोनवणे घेत आहेत या विषयी सविस्तर वृत्त असे की रोहन गलांडे एक मराठा असल्यामुळे व मराठा आरक्षणात सक्रीय असल्याने मराठा समाजातील मुंदडा यांच्या कार्यकर्त्यांनी व मुंदडाच्या कार्यकर्ते जरांगे पाटील समर्थक पत्रकार रोहन गलांडे यांना मागिल दोन चार दीवसापुर्वी जिवे मारण्यांची धमकी देण्यात आली होती कारण पत्रकार रोहन गलांडे पाटील यांची परखड लेखनी विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांना जाचक वाटत आहे व त्यामुळे त्यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांन कडुन रोहन गलांडे यांना धमकावून जिवे मारण्यांची धमकी दिली आहे तरी पत्रकार रोहन





गलांडे पाटील यांना केज अंबाजोगाई मतदार संघाचे आमदार नमीता मुंदडा व त्यांच्या कार्यकर्त्यांन कडुन जिवीतास धोका असल्याने बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ यांनी पोलिस अधीक्षक यांना मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील समर्थक पत्रकार रोहन गलांडे पाटील यांना संरक्षण देण्यासाठी पत्रा द्वारे मागणी केली आहे.तरी रोहन गलांडे पाटील यांनी खासदार बजरंग सोनवणे यांचे आभार मानले आहेत.

# मिरवणुकीचा खर्च टाळुन केले महाप्रसादाचे वाटप



युसूफवडगांव। प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील जय तुळजाभवानी मित्र मंडळाने नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने व देवीच्या मिरवणुकीचा खर्च टाळुन गावकऱ्यांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते.

गेल्या १५ वर्षापासुन अखंडपणे देवीची स्थापना करून तिची मनोभावे पुजा करण्याचे पुण्यकर्म जय तुळजाभवानी मित्र मंडळाच्या वतीने करण्यात नवरात्र उत्सवाची सुरूवात महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या कृपेने श्री क्षेत्र तुळजापूर येथुन पायी चालत ज्योत आणुन केली जाते.या ज्योतची स्थापना देवीच्या मंडपात करण्यात येते.या नऊ दिवसामध्ये देवीच्या समोर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.देवीची मंचकी निद्रा कोजागिरी पौर्णिमेस समाप्त होऊन देवीच्या मुर्ती गावातुन वाजत गाजत मिरवणुक काढण्यापेक्षा मिरवणुकीचा खर्च टाळुन गावकऱ्यांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते या उपक्रमा बद्दल गावकऱ्यांच्या वतीने या जय तुळजाभवानी मित्र मंडळाचे कौतुक करण्यात आले.



घनसावंगी : तालुक्यातील कुंभार पिंपळगाव येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे हे आले असता माजी मंत्री अर्जुनराव खोतकर व जालना शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी त्यांची भेट घेतली यावेळी राष्ट्रसंत भगवान बाबा यांची प्रतिमा त्यांना भेट देण्यात आली व महाराष्ट्रातील तमाम वंजारी समाज बांधवांसाठी राष्ट्रसंत भगवान बाबा आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे अशी मागणी मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली . व वंजारी समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले जाईल असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी दिले

# भटक्या-विमुक्तांचे प्रश्न मार्गी लावणे महत्त्वाचे-संगीताताई पवार

पिंपळवंडी। प्रतिनिधी

स्वातंत्र्यापासून भटक्या विमुक्त समाज आजही विकासापासून वंचित असून या समाजाचा राज्यकर्त्यांनी केवळ वोटबँक म्हणून वापर केल्यामुळे समाज उपेक्षित राहिला व समाजाला वंचित ठेवले.भटक्या- विमुक्त जाती जमातीच्या समस्या सोडविण्यासाठी संघटना कार्य करीत संघटनेला राजकारण नाही तर भटक्या-विमुक्तांचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम करायचे आहे.असे मार्गदर्शन चिंतन शिबिरात संगीताताई पवार यांनी केले.पाटोदा तालुका येथील शासकीय विश्रामगृहात दि.१४/१०/२०२४ सोमवार रोजी अखिल भारतीय भटके-विमुक्त जाती जमातीच्या हक्कासाठी जिल्हास्तरीय चिंतन



शिबिर संपन्न झाले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संगीताताई पवार अध्यक्ष भटक्या-जाती,विमुक्त जमाती संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सुधीर अनवले अध्यक्ष भा.वि.वि.संघटना महाराष्ट्र राज्य व बाबुराव फुलमाळी प्रदेश कार्याध्यक्ष,दगडू दादा गायकवाड,प्रा.नवनाथ जाधव,डॉ. केशवदास वैष्णव,रमेश धोत्रे, ॲड.विशाल मस्के तसेच अण्णासाहेब मतकर जिल्हाध्यक्ष रासप बीड, आसाराम महारनवर तालुका अध्यक्ष पाटोदा,प्रा.भागवत माने तसेच हनुमंत धनवटे जिल्हाध्यक्ष आदींची होती. यावेळी डॉ. वैष्णव, ॲड.विशाल मस्के, दगडू गायकवाड, रमेश धोत्रे, बाबुराव फुलमाळी, सुनील अनवले यांनी जमलेल्या समाज बांधवांना भाषणातून मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी वक्त्यांनी भाषणातून शिक्षण हा समाज सुधारण्याचा मुख्य पाया असून शिक्षणानेच माणूस मोठा होतो. शिक्षणाने कुटुंबाची व समाजाची प्रगती होते.शिक्षणाने संघर्ष करण्याची प्रेरणा मिळते.शिक्षणाअभावी भटक्या- विमुक्त जाती-जमाती मागासलेल्या आहेत.त्यासाठी सर्व समाजबांधवांनी एकत्रित येऊन संघटित व्हावे व आपल्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून उच्च शिक्षण द्यावे व पारंपरिक व्यवसायात गुरफटून न राहता शिक्षणावर भर द्यावा.तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजे छत्रपती शाहू महाराज, सावित्रीबाई फुले,महात्मा ज्योतिबा फुले यांचा आदर्श व शिकवण आचरणात आणण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला भटके-विमुक्त जाती जमाती समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.कार्यक्रमाचे आयोजन हनुमंत धनवटे महाराज बीड जिल्हाध्यक्ष यांनी उत्कृष्ट केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ जाधव यांनी केले.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन



पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १५ ऑक्टोबर रोजी माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीप्रित्यर्थ वाचनप्रेरणा दिवसानिमित्त ग्रंथ प्रदर्शन उत्साहात संपन्न झाले.

महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या वतीने आयोजित या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, डॉ. मनोजकुमार प्रकाश, डॉ. न. पु. काळे, डॉ. शकुंतला बडे, डॉ. काकासाहेब पोकळे, डॉ.प्रकाश फड, डॉ. हनुमान खेत्री, डॉ. सोमनाथ लांडगे, प्रा. मनिषा गाढवे, प्रा. रुपेश कोकाटे, डॉ. मच्छिन्द्र शेळके, अंगद दराडे आदि उपस्थित होते.प्रदर्शनात हस्तपुस्तिका, ज्ञानकोश, मराठी रियासत, भारत ज्ञानकोष, महाराष्ट्र संस्कृती कोष, मराठी वाङ्मय कोष, शोधविज्ञान कोष, संदर्भकोष, वाक्यकोष, विश्वकोष वार्षिकी, भारतीय स्थलकोष, आत्मचरित्रे, महाराष्ट्र संदर्भ, सामाजिक ज्ञानकोष, इंटरनॅशनल एनसायक्लोपिडीया ऑफ करिअर, अंकसंस्कृतीकोष, भारतीय समाजविज्ञान कोष इ. ग्रंथ ठेवण्यात आले होते. ग्रंथ प्रदर्शनाचा कनिष्ठ व वरिष्ठ विभागाच्या विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी लाभ घेतला व ग्रंथ वाचन केले.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/६८८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २३/०९/२०२४

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) गिरधारीलाल मदनलाल जांगीड ,२) मंजुदेवी गिरधारीलाल जागींड दोघे रा. अंबड ता. अंबड जि. जालना

प्रकरण : सर्व्हे नं. १ (भाग) सि.स.नं. २२५९, प्लॉट नं. १४

न.प.मि.न. १८-१३८-१४ आर.सी.सी. रो-हाऊस क्र. ०५ चे हस्तांतरण करणेबाबद

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (वरील प्रमाणे) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व-याच सर्व्हे नं. मधील जमीन
पश्चिम : कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण-प्लॉट नं.१३ मधील रो-हाऊस क्र .०४
उत्तरः प्लॉट नं. १४ मधील रो-हाऊस क्र .०६

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/६९०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २३/०९/२०२४

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) रामेश्वरलाल मदनलाल जांगीड ,२) संतोषदेवी रामेश्वरलाल जांगीड दोघे रा. अंबड ता. अंबड जि. जालना

प्रकरण : सि.स.नं. २२५९, प्लॉट नं. १३ न.प.मि.न. १८-१३८-१३ चे हस्तांतरण करणेबाबद

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१३८-१३) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व-याच सर्व्हे नं. मधील जमीन
पश्चिम : कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण-प्लॉट नं.१२ मधील रो-हाऊस क्र .०२
उत्तरः प्लॉट नं. १३ मधील रो-हाऊस क्र .०४

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/६८९
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :-२३/०९/२०२४

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) सुरेश कुमार जांगीड ,२) सुनिता सुरेश जांगीड दोघे रा. अंबड ता. अंबड जि. जालना

प्रकरण : सर्व्हे नं. १ (भाग) सि.स.नं. २२५९, प्लॉट नं. १४

न.प.मि.न. १८-१३८-१४ रो-हाऊस क्र. ०६ चे हस्तांतरण करणेबाबद

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (वरील प्रमाणे) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व-याच सर्व्हे नं. मधील जमीन
पश्चिम : कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण-प्लॉट नं.१४ मधील रो-हाऊस क्र .०५
उत्तरः प्लॉट नं. १५ मधील रो-हाऊस क्र .०७

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# सहा विधानसभा मतदारसंघात बजावणार २१,९७,८३० मतदार मतदानाचा हक्क

## सर्व मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा -जिल्हाधिकारी अविनाश पाठक

**बीड । प्रतिनिधी**

लोकशाहीच्या उत्सवात सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे. बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा सार्वत्रिक निवडणूक क्षेत्रातील संपूर्ण मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन बीडचे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी मतदारांना केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत श्री.पाठक बोलत होते. यावेळी पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ, प्र. अपर जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, बीड विधानसभा क्षेत्राच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांची उपस्थिती होती.



शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे. भारत निवडणूक आयोगाने विधानसभा २०२४ साठी निवडणूक कार्यक्रम (ता.१५) घोषित केला आहे. घोषित केल्यापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. जिल्ह्यात गेवराई, माजलगाव, बीड, आष्टी, केज व परळी अशी सहा विधानसभा मतदार संघ आहेत. या सहाही मतदार संघात एकूण २१ लक्ष ९७ हजार ८३० मतदार आहेत. त्यामध्ये १५ लक्ष ५८ हजार ९९८ पुरूष, १० लक्ष ३८ हजार ८०९ महिला मतदार आहेत. तृतीय पंथी मतदार २३ आहेत. या मतदारांमध्ये दिव्यांग मतदार नऊ हजार २७२ आहेत. ज्यामध्ये पाच हजार ९८४ पुरूष, तीन हजार २८८ महिला मतदार आहेत. वय वर्ष ८५ हून अधिक मतदार ३८ हजार १४० आहेत, ज्यामध्ये १५ हजार ५२० पुरूष, २२ हजार ६२० महिला पान २ वर

### दिव्यांग व वृद्ध मतदारांना घरूनच मतदान करता येणार

बीड जिल्ह्यामध्ये ९२७२ अपंग मतदार असून यापैकी ५९८४ पुरुष तर ३२८८ महिला आहेत. याशिवाय ८५ वर्ष वयापेक्षा अधिक वय असलेले मतदार ३८ हजार १४० असून यामध्ये १५५२० पुरुष तर २२६२० महिला आहेत त्यांना घरी बसून मतदान करता येणार असून कर्मचारी घरोघरी जाऊन फॉर्म भरून घेतील .त्यांचे मतदान केंद्रावर यादीमध्ये नाव असणार नाही असेही पाठक यांनी सांगितले.



**बीड - आमदार पंकज भुजबळ यांची विधान परिषदेवर निवड झाल्याबद्दल समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.**

# बीडमध्ये निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सज्ज

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने सोशल मीडिया,बूथ व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून सातत्याने दावा केला जात आहे. आता आचारसंहिता जाहीर झाली असून निवडणुकीसाठी बीड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सज्ज झाला असल्याचे चित्र आहे.

बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे आयोजित सोशल मीडिया आणि बूथ व्यवस्थापनाचे प्रभावी प्रशिक्षण नुकतेच संपन्न झाले. ज्यात ४७५ पेक्षा अधिक कार्यकर्त्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदवला.






आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी प्रशिक्षणातून सोशल मीडिया तंत्रज्ञानाचे आधुनिक कौशल्य आणि बूथ व्यवस्थापनाच्या रणनीती शिकत, पान २ वर

### डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतला बूथनिहाय आढावा

बीड मतदारसंघात पक्षाच्या खाजगी कंपनीकडून सुरू असलेल्या प्रचार व प्रसार मोहिमेवरून सध्यातरी पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांना उमेदवारी असल्याचे संकेत मिळत आहेत. तसेच, यापूर्वी पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांनी देखील ताकदीने कामाला लागण्याच्या सूचना केलेल्या आहेत. नुकताच डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बूथनिहाय आढावा घेऊन यंत्रणा सज्ज असल्याचे स्पष्ट केले आहे.

# वाहतुकीला काही शिस्त आहे की नाही?

## प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहराला जड वाहतुकीसाठी बायपास असतानाही ती शहरातून जात असल्याने तसेच मुख्य रस्त्यावर वाहन धारक आपली वाहने लावत असल्याने वाहतुकीची कोंडी निर्माण होत आहे.

अंबाजोगाई येथील भगवान बाबा चौक,बस स्थानक,छत्रपती शिवाजी महाराज चौक,मोंढा ते यशवंतराव चव्हाण चौक हा मुख्य वाहतुकीसाठीचा मार्ग आहे.हा रस्ता अंबाजोगाई शहरातून जात असल्याने या रस्त्यावरून जड वहातुक करण्याची परवानगी नसतानाही बहुतांशी चालक हे आपले वाहन बायपास रस्त्यावरून न जाता प्रमुख शहरातून जाणाऱ्या रस्त्यावरून आपली व्हावे सुसाट वेगाने घेऊन जात असल्याने अपघात होण्याची संभावना नाकारता येत नाही. त्यातच अंबाजोगाईतील दोन,चार चाकी तसेच अँटोरिक्षा,फळ विक्री करणारे हातगाडे मुख्य रस्त्यावर लावत असल्याने दररोज वाहतूक कोंडी होत असल्याचे पहावयास मिळत आहे. या वाहतूक व्यवस्थेला कोणी वाली आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे.

वाहन धारकांना तसेच पायी चालणाऱ्यांना आपला जीव मुठीत धरून चालावे लागत आहे. या रस्त्यावर अनेकदा अपघात झालेले आहेत. पुढेही अपघात होण्याची संभावना नाकारता येत नाही. वहातुक पोलीस कोठे असतात याचा थांग पत्ताही लागत नाही.बेशिस्त गाड्या व वहातुक याचा त्रास सर्व सामान्यांना होत असल्याने या गोष्टीकडे प्रशाशन लक्ष देईल का ? असा प्रश्न नागरिकांतुन उपस्थित केला जात आहे.



### अधुन मधुनच पोलिस गाडी फिरते

**अंबाजोगाईतील वाहतुकीला शिस्त लावण्याची गरज आहे. हे वहातुक पोलिस तुरळक असले तरी सकाळ व संध्याकाळी पोलिस गाडी सायरन लावून शिस्तबद्ध वहातुक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करीत असते परंतु ह्या दहा,पंधरा मिनिटापुरती पोलिस गाडीचे दर्शन नागरिकांना होते हे तेवढेच सत्य आहे.**

# संघटनेला राजकारण नाही,तर भटक्या-विमुक्तांचे प्रश्न मार्गी लावणे महत्त्वाचे-संगीताताई पवार

पिंपळवंडी । प्रतिनिधी

स्वातंत्र्यापासून भटक्या विमुक्त समाज आजही विकासापासून वंचित असून या समाजाचा राज्यकर्त्यांनी केवळ वोटबँक म्हणून वापर केल्यामुळे समाज उपेक्षित राहिला व समाजाला वंचित ठेवले.भटक्या- विमुक्त जाती जमातीच्या समस्या सोडविण्यासाठी संघटना कार्य करीत संघटनेला राजकारण नाही तर भटक्या-विमुक्तांचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम करायचे आहे.असे मार्गदर्शन चिंतन शिबिरात संगीताताई पवार यांनी केले.पाटोदा तालुका येथील शासकीय विश्रामगृहात दि.१४/१०/२०२४ सोमवार रोजी अखिल भारतीय भटके-विमुक्त जाती जमातीच्या हक्कासाठी जिल्हास्तरीय चिंतन शिबिर संपन्न झाले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संगीताताई पवार अध्यक्ष भटक्या-जाती,विमुक्त जमाती संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सुधीर अनवले अध्यक्ष भा.वि.वि.संघटना महाराष्ट्र राज्य व बाबुराव फुलमाळी प्रदेश कार्याध्यक्ष,दगडू दादा गायकवाड,प्रा.नवनाथ जाधव,डॉ. केशवदास वैष्णव,रमेश धोत्रे, ॲड.विशाल मस्के तसेच अण्णासाहेब मतकर जिल्हाध्यक्ष रासप बीड, आसाराम महारनवर तालुका अध्यक्ष पाटोदा,प्रा.भागवत माने तसेच हनुमंत धनवटे भ.जा.वि.जमाती बीड जिल्हाध्यक्ष आदींची होती. यावेळी डॉ.वैष्णव,ॲड.विशाल मस्के,दगडू गायकवाड,रमेश धोत्रे,बाबुराव फुलमाळी,सुनील अनवले यांनी जमलेल्या समाज बांधवांना पान २ वर



**पाटोदा येथे भटक्या विमुक्तांचे चिंतन शिबिर संपन्न**

# माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत अंजनडोहच्या नूतन माध्यमिक विद्यालयाचा तालुक्यात दुसरा क्रमांक

किल्लेधारूर । प्रतिनिधी

माझी शाळा सुंदर शाळा टप्पा २ अभियाना अंतर्गत मध्ये खाजगी संस्था गटात नूतन माध्यमिक विद्यालय अंजनडोह या शाळेचा धारूर तालुक्यात द्वितीय क्रमांक. मिळवला असून या शाळेच्या यशा बद्दल सर्वत्र कौतूक होत आहे.



मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हा उपक्रम नूतन माध्यमिक विद्यालयात राबवत असताना शाळेतील सर्व घटकांची पाहणी करण्यात आली. यामध्ये पायाभूत सुविधा, सहल, विज्ञान प्रदर्शन, सहशालेय उपक्रम ,विद्यार्थी स्वच्छता, शाळा सुरक्षा प्रतिज्ञा, वर्गखोल्या सजावट ,शाळेचा परिसर, परसबाग ,शाळा स्तर सखी सावित्री समिती, विद्यार्थी संसद, तक्रारपेटी , महा वाचन,या सर्व बाबींची पाहणी गटशिक्षणाधिकारी कार्यालय धारूर. यांच्यामार्फत करण्यात आली परीक्षानानंतर नूतन माध्यमिक विद्यालयाचा तालुक्यात द्वितीय क्रमांक आला. याबद्दल ,माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमाच्या प्रमुख श्रीमती सीमा रामराव ठोंबरे व सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आणि विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वरराव ठोंबरे , संस्थेचे सचिव सुंदरराव आदमाने , संस्थेचे सर्व पदाधिकारी,शाळेचे मुख्याध्यापक श्री. देशमुख सर, सर्व पालक ,शिक्षण प्रेमी नागरिक ,व सर्व ग्रामस्थांकडून विशेष कौतुक करण्यात आले.

# आष्टी विधानसभा मतदारसंघात ४४० मतदान केंद्र तर ३७ संवेदशील केंद्रे -तहसिलदार वैशाली पाटील

**आष्टी । प्रतिनिधी**

विधानसभा -मतदारसंघासाठी मंगळवारपासून - आचारसंहिता लागू झाली आहे.या विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांच्या - खर्चाची मर्यादा ४० लाख रुपये इतकी राहणार आहे.दरम्यान विधानसभेसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी १० हजार रुपये इतकी अनामत रक्कम राहणार आहे.अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिली आहे. आष्टी विधानसभा मतदार संघाची निवडणुकीच्या अनुषंगाने आष्टी तहसिल कार्यालयात बुधवार (दि.१६) रोजी दुपारी ५ वा.आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत पाटील बोलत होते.पुढे बोलतांना सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पाटील म्हणाल्या,आष्टी मतदारसंघात पुरूष मतदार २ लाख ३ हजार ८३८,स्त्री मतदार १ लाख ९ हजार १९१ असे एकूण ३ लाख ८३ हजार ३० मतदार असून,एकूण ४४० मतदान केंद्र यामध्ये ३७ मतदान केंद्र हे संवेदनशील असल्याची माहिती पाटील यांनी दिली.

# जागतिक अंध दिनाचे औचित्य साधून मराठवाड्यातील दिडशे अंध व्यक्तींना पांढऱ्या काठीचे वितरण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील बीअँड व्हीजन फाउंडेशन लातूरच्या वतीने राजस्थानी मंगल कार्यालयात मराठवाड्यातील दीडशे अंध व्यक्तींना पांढऱ्या काठीचे वितरण करण्यात आले .अंध व्यक्ती विषयी जनजागृती कार्यक्रम १५ ऑक्टोबर रोजी मंगळवारी संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉक्टर माधव गोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून अंबाजोगाई येथील मानवलोक संस्थेचे कार्यवाहक अनिकेत लोहिया आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पुरुषोत्तम चोपडा हे होते.



बीअँड व्हीजन फाउंडेशन ही संस्था सर्व प्रकारच्या दिव्यांग व्यक्तीसाठी शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार, साहित्य, मनोरंजन ,सांस्कृतिक व सामाजिक पुनर्वसन क्षेत्रात कार्यरत असणारी लातूर येथील सेवाभावी संस्था पान २ वर

# तलवाड्यात बदामराव पंडितांच्या नेतृत्वाखाली असंख्य कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली तलवाडा येथील असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.



गेवराई विधानसभा मतदारसंघातून तीन वेळेस आमदार राहिलेले माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून यावेळी विधानसभेची निवडणूक लढविणार आहेत. विधानसभा निवडणूक जाहीर होण्याअगोदरच बदामराव पंडित यांनी गेवराई मतदार संघात भेटीगाठीचा आपला एक दौरा पूर्ण केला आहे या दौऱ्या दरम्यान अनेक गावातील राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपच्या असंख्य पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. शिवसेनेमध्ये होणारी ही इनकमिंग सुरूच असून दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ रोजी तलवाडा येथील सुनील डोंगरे, महेमूद भाई, जितेंद्र आठवले, शेख नवीद, शेख रियान, श्रावण आठवले, शेख रज्जाक, भाऊसाहेब जगताप, शेख इमरान, आसाराम जाधव, आकाश आठवले आदींसह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला. पान २ वर

# विद्यार्थ्यांनी मोबाईल सोडून वाचनात मग्न व्हावे - श्रीमती प्रज्ञा सौंदरमल

**उपळी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील उपळी येथील उपळी हायस्कूल उपळी मध्ये काल भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती दिनानिमित्त वाचन मुख्याध्यापक भागवतराव बडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रेरणा दिन उत्साहात साजरा केला. यावेळी शाळेतील इंग्रजी विषयाच्या शिक्षिका श्रीमती प्रज्ञा सौंदरमल यांनी विद्यार्थ्यांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त मोलाचे मार्गदर्शन केले यावेळी बोलताना मॅडम म्हणाल्या की एक वेळेस शिक्षकांनी डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांना शिक्षा केली होती त्या शिक्षेमुळे त्यांनी मन लावून आपण इथून पुढे चांगल्या प्रकारे अभ्यास करून वर्गात सर्वात जास्त गुण घेऊन पुढे यायचे यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जर आपण अभ्यास केला तर आपण वर्गामध्ये टॉपर राहू अशी भावना निर्माण झाली यावेळी मॅडमनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले त्याचबरोबर शाळेचे पर्यवेक्षक शंकर घाडगे यांनी सुद्धा डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या विविध आठवणी सांगून विद्यार्थ्यांना मंत्रमुक्त केले या कार्यक्रमासाठी सूत्रसंचालक म्हणून गणित विषयाचे तज्ञ श्री प्रकाश गोरे सर यांनी उत्कृष्ट रित्या सूत्रसंचालन केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तसेच विद्यार्थ्यांनी मोलाचा सहभाग घेतला.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सुनेत्रा पवार बारामतीत कशा हरल्या, निकालाच्या चार महिन्यानंतर विजय शिवतारेंनी सविस्तर सांगितलं!

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणुकांची घोषणा झाली असून आजही लोकसभा निवडणुकीतील विजय आणि पराजयाची चर्चा होतेय. कारण, विधानसभा निवडणुकांना लोकसभेची पार्श्वभूमी जोडली जात असून त्याच अनुषंगाने विधानसभा निवडणुकांची रणनीती आखण्यात येत आहे. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी यांच्यात काँटे की टक्कर होणार असून विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारांच्या घोषणेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे महायुतीमध्ये वरिष्ठ पातळीवर जागावाटपाचा फॉर्म्युला अंतिम होत असून गृहमंत्री अमित शाह यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना त्यागाची शिकवण दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. त्यावरुन, बोलताना शिवसेना शिंदे गटातील नेते आणि माजी मंत्री विजय शिवतारे यांनी पुन्हा एकदा बारामती लोकसभा निवडणुकांच्या विषयाला हात घातला. तसेच, बारामतीमध्ये सुनेत्रा पवार यांच्या पराभवाचं सविस्तर व पद्धतशीर



विश्लेषणही त्यांनी केलंय.

लोकसभा निवडणुकांवेळी बंडाच्या भूमिकेत असलेल्या विजय शिवतारेंनी आता विधानसभा निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. मी आपल्याला सांगतो, महायुतीच्या नेत्यांनी, माझे नेते मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, देवेंद्र फडणीस आणि अजित दादा पवार हे तिघे मिळून जेव्हा निर्णय घेतील, त्यावेळेस पुरंदरमधून विजय शिवतारे आणि विजय शिवतारेच लढणार. म्हणून त्या बाबतीमध्ये त्यांनी जे आदेश दिले ते मी पाळले असे म्हणत उमेदवारीच्या घोषणेची आपण वाट पाहात असल्याचे शिवतारे यांनी म्हटले. दरम्यान, यावेळी, बारामती लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार यांचा पराभव नेमका कसा झाला, याबाबतही त्यांनी सविस्तर माहिती दिली.

शेवटी जनता जनार्दन अंतिम आहे, मला एवढं माहिती होतं की माझी १ लाख मतं आहेत. ही मतं कुठल्याही परिस्थितीत दादांना द्यायची, ती मतं कुठल्याही परिस्थितीत दादांना द्यायची हे मी ठरवलं, थोडसं कुठंतरी कमी पडलो. थोडीशी सेंटिमेंटल इनकॅशमेंट होती, घरातला प्रश्न असल्यामुळे तो पराभव झाला. माझ्या मतदारसंघातून लीड नाही मिळालं असं नाही. उदाहरण बघा, आमचे आढळराव पाटील लढले, त्या मतदारसंघात महायुतीचे सगळे आमदार आहेत. पण, लीड नाही मिळाला. एखाद्यावेळेस असं वारं फिरतं. गैरसमज व फेक नेरेटीव्ह पसरले गेले, संविधान बदलणार, आरक्षण घालवून टाकतील, मुस्लिमांमध्ये भीतीचं वातावरण पसरवलं गेलं, असे सविस्तर विश्लेषण विजय शिवतारे यांनी विधानसभा निवडणुकाचं केलंय.

तो आजचा प्रश्न नाही

लोकसभेला तुम्ही ज्या पद्धतीने अजित पवारांच काम केलं, उमेदवार सुनेत्रा पवारांसाठी काम केलं, त्या पद्धतीने अजित पवार गट, अजित पवार हे तुमच्यासाठी काम करतील असं वाटतं का, असा प्रश्न शिवतारे यांना विचारण्यात आला होता. त्यावर, मला वाटतं आजचा हा प्रश्नच नाही, असेही उत्तर शिवतारे यांनी दिलं.

# देशातील पहिल्या संविधान भवनाची पायाभरणी

पिंपरी, ( प्रतिनिधी) – जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताच्या लोकशाहीचा पाया संविधान आहे. संविधानाचा प्रचार, प्रसार आणि जनजागृती व्हावी. या करिता देशातील पहिले संविधान भवन पिंपरी-चिंचवडमध्ये उभारले जात आहे. त्याची पायाभरणी आज झाली. संपूर्ण पिंपरी-चिंचवडकरांना अभिमान वाटावा, असे संविधान भवन उभारले जाईल, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.



भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (झचठऊ-) च्या पेठ क्रमांक ११ मध्ये संविधान भवन व विपश्यना केंद्र उभारण्यात येणार आहे. त्याचे भूमिपूजन आज करण्यात आले. यावेळी माजी महापौर राहुल जाधव, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष नितीन लांडगे, ऋसंतोष लोंढे, ऋविलास मडिगेरी, आरपीआयच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे, हर्षवर्धन भन्ते, माजी नगरसेवक विकास डोळस, माजी नगरसेविका अनुराधा गोरखे, माजी नगरसेविका नम्रता लोंढे, संतोष कांबळे, अंबरनाथ कांबळे, सागर आंघोळकर, बाबा त्रिभुवन, बाळासाहेब ओव्हाळ, आरपीआयचे शहराध्यक्ष कुणाल व्हावळकर, बाळासाहेब भागवत, सखाराम बाप्पु डोळस, संदिपान झोबांडे, अजय निसर्गंध, कुंदन गायकवाड, चंद्रकांत डोळस, अमोल डोळस, भाऊसाहेब डोळस, विनोद (पिनु) डोळस, अनिकेत भुलाडे, अक्षय चव्हाण, प्रशांत बाराथे आदी उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, शहरात २०१९ मध्ये पिंपरी-चिंचवड नवनगर प्राधिकरणाच्या माध्यमातून संविधान भवन उभारणीसाठी पाठपुरावा सुरू केला. त्यानंतर 'पीसीएनटीडीए'चे विलिनीकरण पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरणामध्ये करण्यात आले. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात सदर प्रकल्प लांबणीवर पडला. महायुतीची सत्ता आल्यानंतर २०२२ मध्ये पुन्हा या कामाला गती देण्यात आली. प्रस्तावित जागा 'पीएमआरडीए'कडून पालिकेकडे हस्तांतरित करण्यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडेही आम्ही पाठपुरावा केला. आता संविधान भवनाचे भूमिपूजन झाले आहे, याचे विशेष समाधान आहे.

# प्रचारात १० पेक्षा अधिक वाहने नको; आदेशाचा भंग करणाऱ्यांवर कारवाई, पोलिसांकडून आचारसंहितेची अंमलबजावणी

**पुणे । प्रतिनिधी**

शहर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत ११ विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. येथील निवडणुका शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी सह पोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी आचारसंहिता अंमलबजावणीच्या अनुषंगाने महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत.

पुणे शहर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत शिरूर, पुरंदर, भोर, वडगाव शेरी, शिवाजीनगर, कोथरूड, खडकवासला, पर्वती, हडपसर, पुणे कॅन्टोनमेंट आणि कसबा या ११ विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. तेथील निवडणुकांमध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, म्हणून शर्मा यांनी आदेश दिले आहेत. हे आदेश २५ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहेत. या आदेशाचा भंग करणाऱ्यांवर नियमानुसार कायदेशीर कारवाई केली जाईल, असे देखील प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगण्यात आले



आहे.

याची चोख अंमलबजावणी करा

१) कोणत्याही कारणासाठी सार्वजनिक सभा/सभेचे ठिकाण व वेळ याबाबत संबंधित पोलिस ठाण्याच्या पोलिस अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. २) कोणत्याही प्रकारच्या मिरवणुका काढण्याबाबत संबंधित पोलिस ठाण्याच्या पोलिस अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. ३) ध्वनिक्षेपकाचा वापर कोणत्याही प्रकारे रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत करू नये. ४) फिरत्या वाहनांवरून ध्वनिक्षेपकाचा वापर करू नये. ध्वनिक्षेपकाचा वापर वाहन थांबवूनच करावा. ५) ध्वनिक्षेपकाचा परवाना जवळ बाळगावा. ६) ध्वनिक्षेपकाच्या आवाज मर्यादेची काटेकोरपणे पालन करावे. ७) शाळा, कॉलेज, रुग्णालय या ठिकाणी थांबून ध्वनिक्षेपकाचा वापर करू नये.

८) निवडणुकीच्या कालावधीत प्रचाराच्या अनुषंगाने एका वेळी कोणत्याही परिस्थितीत १० पेक्षा अधिक वाहने एका ताफ्यात चालवू नयेत, तसेच दोन ताफ्यातील अंतर २०० मीटर/१५ मिनिटांचे असावे. ९) ज्या मार्गाने मिरवणूक किंवा जमाव जाईल अथवा जाणार नाही, ती वेळ व मार्ग पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी निश्चित करावा.

१०) सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक करमणूक कार्यक्रमाच्या वेळी वापरण्यात येणाऱ्या लाऊड स्पीकरच्या ध्वनीची तीव्रता आणि निश्चित करून दिलेली वेळ यावर पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी नियंत्रण करावे.

# रब्बीत ३१ लाख ५० हजार मेट्रिक टन खतपुरवठा

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने राज्यातील रब्बी हंगामातील पिकांसाठी ३१ लाख ५० हजार मेट्रिक टन खतांचा पुरवठा मंजूर केलेला आहे. रब्बी हंगामातील खतांचा सरासरी वापर २४ लाख ५० हजार मे. टन ते २५ लाख मे. टन इतका आहे. याचा विचार करता खतांच्या मुबलक पुरवठ्याचे नियोजन कृषी आयुक्तालयाने केल्याचे सांगण्यात आले.

गतवर्षी रब्बी हंगाम २०२३-२४ मध्ये खतांची विक्री सुमारे २० लाख मे. टन इतकी झाली होती. यंदा पेरण्यांचा टक्का वाढण्याच्या अपेक्षेमुळे त्यापेक्षा अधिक खत विक्री अपेक्षित आहे, तर



खरीप २०२४ मधील पुरवठा झालेल्या खतांमधील १८ लाख मे. टन खते सध्या शिल्लक आहेत. शिवाय चालू वर्षीचा मागणीपेक्षा अधिक असलेला खतांचा पुरवठा लक्षात घेता यंदा मुबलक खते उपलब्ध राहतील, अशी माहिती आयुक्तालयातील अधिकार्यांनी दिली. त्यामध्ये रब्बी हंगामात प्रामुख्याने युरिया १० लाख मे. टन, डाय अमोनियम फॉस्फेट (डीएपी) २ लाख ५० हजार मे. टन, म्युरेट ऑफ पोटॅश (एमओपी) एक लाख मे. टन, संयुक्त खते १२ लाख मे. टन, सिंगल सुपर फॉस्फेट (एसएसपी) सहा लाख मे. टन, याप्रमाणे मिळून ३१ लाख ५० हजार मे. टन खतांचा पुरवठा महाराष्ट्राला करण्यावर शिक्कामोर्तब झालेले आहे. रब्बी हंगामात याशिवाय ३४ लाख ७० हजार नॅनो युरिया बॉटल अणि नॅनो डीएपीच्या ११ लाख बॉटल म्हणजेच एकूण ४५ लाख ७० हजार नॅनो बॉटलच्या खतांच्या उपलब्धतेचे नियोजन करण्यात आले आहे. खतांच्या मुबलक पुरवठ्याचे नियोजन कृषी विभागाने केलेले आहे. तसेच सद्य:स्थितीत खते विक्रेत्यांकडे सुमारे चार लाख मे. टन इतक्या खतांचा पुरवठा झालेला आहे. याशिवाय नॅनो युरिया व नॅनो डीएपीच्या बॉटलचा पुरवठाही वेळेवर करण्याचे नियोजन कृषी विभागाने केलेले आहे.

# 'एमआयटी एडीटी' विद्यापीठामध्ये 'भारत-जपान फ्युजन फॅशन शो' उत्साहात

**पुणे । प्रतिनिधी**

येथील एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नोलॉजी विद्यापीठात नुकताच बहुप्रतीक्षित भारत-जपान फ्युजन फॅशन शोचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात आपली सांस्कृतीक परंपरा जपा, शान वाढवा या विषयांतर्गत भारतीय आणि जपानी परिधान परंपरेचे संमिश्र प्रदर्शन झाले. ज्यामध्ये पारंपरिक भारतीय साडी आणि जपानी किमोनो यांचा समन्वयाने आधुनिक वेगळेपणा जपणाऱ्या फॅशनेबल कपड्यांचे प्रदर्शन दाखविले गेले. हे सर्व पोषाख विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी परिधान करून त्यांनी फॅशन शोमध्ये सहभाग घेतला.

यावेळी, विद्यापीठाचे कुलगुरू तथा कार्याध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड, प्र.कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, अधिष्ठाता



डॉ.मिलिंद ढोबळे, डॉ.आनंद बेल्हे, कॅप्टन प्रेरित मिश्रा, डॉ.अतुल पाटील, प्रा.पद्माकर फड आदी मान्यवर उपस्थित होते.

पुण्यात अशाप्रकारच्या कार्यक्रम तथा फॅशन शोचे पहिल्यांदा आयोजन झाल्याने त्याला विद्यार्थ्यांसह विद्यापीठातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून भारतीय-जपानी वस्त्रकलेचा एक वेगळा अविष्कार पाहावयास मिळणार आहे. फॅशन शोमध्ये जपानी डिझायनर काजुको बारिसिक यांनी तयार केलेल्या खास संग्रहाचे सादरीकरण झाले आहे. या संग्रहात पुनर्नवीनीकृत किमोनो कापडांचा भारतीय डिझाइनसोबत असलेला संगम पाहायला मिळाला. याशिवाय, भारत-जपान संबंध तज्ञ टोमियो इसोगाई यांनी जपानमधील करिअर संधींबाबत मास्टरक्लास आयोजित करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यामुळे, या कार्यक्रमामुळे सांस्कृतिक आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून देखील विद्यार्थ्यांना समृद्ध अनुभव मिळाला.

# इनरव्हील क्लब माजलगाव च्या वतीने कन्या पूजन निमित्त गरजू मुलींना शालेय साहित्य वाटून नवरात्रीची परंपरा पार पाडली

**पुणे । प्रतिनिधी**

नवरात्रीनिमित्त समाज कन्या पूजनाला विशेष महत्त्व आहे या कन्या पूजनाच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकातील बोलवून या कन्यांचे पूजन केले जाते यामध्ये या कन्यांना आवश्यक असणारे साहित्य हे उपहार म्हणून वाटप केले जाते याच पद्धतीचा अनोखा कार्यक्रम इनर व्हील माजलगाव येथे साजरा करण्यात आला या कार्यक्रमाला घरकाम करणाऱ्या महिलांच्या मुलींना कन्या पूजनासाठी आमंत्रित करून या मुलींच्या शिक्षणासाठी इनरव्हील क्लब व या मुलींना लागणारे शालेय साहित्य देऊन त्यांचे कन्या पूजन करण्यात आले. सदरील कार्यक्रम नवरात्रीच्या अष्टमीला घेण्यात आला असून यावेळेस माजलगाव मध्ये सर्व प्रतिष्ठित डॉक्टर नेहा देशपांडे डॉक्टर कांचन कुलकर्णी



डॉक्टर अंजली घाडगे वैशाली निरंजन सविता गौतम छाया देशपांडे प्रतिष्ठितांनी सहभाग घेऊन सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यात मदत केली अशा पद्धतीने या क्लबचे अध्यक्ष प्राजक्ता गुंडेवार व या क्लबच्या सचिव स्मिता कानडे यांनी आयोजित केला होता या संदर्भातून माजलगाव शहरात एक नवीन संदेश समाजाला देण्याचा हा उपक्रम या इनर व्हील क्लब यांनी सार्थकी केला त्यामुळे अशा नव्या परंपरा समाजात जर रुजवल्या तर सामाजिक गरजा व सामाजिक परंपरेमुळे निश्चितच वाढ होईल यासाठी अशा कल्पक उपक्रमांची समाजाला गरज आहे सदरील कार्यक्रम मंगलनाथ सभागृहामध्ये घेण्यात आला असून यासंदर्भात या क्लबचे अध्यक्ष प्राजक्ता गुंडेवार व स्मिता कानडे यांनी समाजामध्ये एक नवीन उपक्रम देऊन महिलांचे मनोगरे वाढवले

गिफ्ट देणाऱ्या आणि घेणाऱ्या दोघांच्याही चेहऱ्यावरील समाधान... आणि आनंद ...

हा प्रकल्प घेणाऱ्या इनरव्हील क्लबच्या सर्व सदस्यांचे मनोबल वाढवणारा ठरला.

# बाबा सिद्दीकी हत्याप्रकरणात मोठी



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाचे नेते आणि राज्याचे माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्यावर शनिवारी गोळीबार झाला. या घटनेमध्ये त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. आमदार झिशान सिद्दिकी यांच्या कार्यालयासमोरच, बांद्रा पूर्वेत खेरवाडी परिसरात ही घटना शनिवारी घडली आहे. तीन अज्ञात व्यक्तींनी बाबा सिद्दिकी यांच्यावर तीन गोळ्या झाडल्या. या प्रकरणी पोलिसांनी संबधितांना ताब्यात घेतल्यानंतर अनेक खुलासे समोर येत आहेत. अशातच बाबा सिद्दिकी हल्ल्याप्रकरणी हल्लेखोरांच्या रूममध्ये राहणाऱ्यांना तरुणांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.

पुण्यातील वारजे परिसरात असलेल्या रूममधून गुल्लू आणि मोनु या दोन जणांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे. आणखी २ जण धर्मराज, गुरमेल आणि शिवकुमार यांच्यासोबत राहत होते. सिद्दीकी यांची हत्या करणारे ३ तरुण हे वारजे परिसरातील बालाजी स्क्रॅप सेंटरमध्ये काम करत होते. हरीष नावाच्या ठेकेदाराने या सगळ्यांना एक रूम भाड्याने करून दिली होती. याच परिसरात असलेल्या या रूममध्ये हे ५ जण राहत होते. गुल्लू आणि मोनु यांचा काही या प्रकरणी काही सहभाग आहे का याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. त्याचबरोबर बाबा सिद्दीकी हत्येप्रकरणी मुंबई पोलिसांनी उत्तर प्रदेशातील बहराइच येथून देखील दोघांना ताब्यात घेतले आहे. हरीष असे ताब्यात घेतलेल्या दोघांपैकी एकाचे नाव असून, त्याच्या भंगार दुकानात धर्मराज आणि शिवप्रसाद गौतम पुण्यात काम करायचे. बाबा सिद्दीकी यांच्यावर गोळीबार करण्याच्या काही दिवस आधी हरीषने शिवप्रसाद आणि धर्मराज यांच्यासाठी नवीन मोबाईल खरेदी केला होता आणि हरीषलाही या घटनेची पूर्ण माहिती होती.बाबा सिद्दीकी यांच्यावर गोळीबार करणाऱ्या आरोपींची नावे गुरमैल सिंह, धर्मराज कश्यप, शिवकुमार उर्फ शिव गौतम अशी आहेत. तर चौथा आरोपीचं नाव मोहम्मद झिशान अख्तर असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. बाबा सिद्दीकींची गोळ्या घालून हत्या करणारे आरोपी २ सप्टेंबरपासून कुर्ल्यात वास्तव्य करत होते. १४ हजार रूपये भाड्याच्या खोलीत हे आरोपी वास्तव्य करत होते. बाबा सिद्दीकींची हत्या करण्याचा कट कुर्ल्यातील एका चाळीत या चार आरोपींमध्ये शिजला. गेल्या ४० दिवसांपासून हे आरोपी कुर्ल्यातील चाळीत राहून सिद्दीकींच्या ऑफिसची रेकी करत होते. बाबा सिद्दीकींची हत्या केल्यानंतर ते आरोपी प्रत्येकी ५० हजार रूपये वाटून घेणार होते. हरियाणातील कत्तर जेलमध्ये तिघे एकमेकांच्या संपर्कात आले होते. दरम्यान, मुंबईतील कुर्ला येथील पटेल चाळीत आरोपी राहत असलेल्या घराचे फोटो समोर आले आहेत. चाळीत फक्त तीन ते चार घरं आहेत, त्यामुळे आरोपींना पटेल चाळीची राहण्यासाठी निवड केली अशी माहिती देखील समोर येत आहे.

# उमेश पाटील शरद पवार गटात प्रवेश करणार? खासदार धैर्यशील मोहिते पाटलांनी पुण्यात घेतली भेट, नेमकी काय झाली चर्चा?

**पुणे । प्रतिनिधी**

आचारसंहीता लागू झाल्यापासून राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राजकीय नेत्यांच्या गाठीभेटी सुरु झाल्या आहेत. अजित पवार गटाचे प्रवक्ते उमेश पाटील आणि शरद पवार गटाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांची पुण्यात भेट झाली आहे. उमेश पाटलांनी काल शरद पवार यांची पुण्यात भेट घेतल्यानंतर घडामोडींना वेग आला आहे. उमेश पाटील हे शरद पवार गटात जाण्याची शक्यता वर्तवली जातेय. अशातच खासदार धैर्यशिल मोहिते-पाटील यांनी उमेश पाटलांच्या पुण्यातील घरी भेट दिल्यानं राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

उमेश पाटील शरद पवार गटात प्रवेश करण्याची शक्यता

माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशिल मोहिते-पाटील यांनी उमेश पाटलांच्या पुण्यातील घरी त्यांची भेट घेतली आहे. या दोघांमध्ये मोहोळ मतदारसंघातील राजकीय विषयावर चर्चा झाल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. मात्र, मोहिते पाटील यांनी उमेश पाटलांची भेट घेतल्यामुळं राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे, उमेश पाटील हे



शरद पवार गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा देखील सुरु झाल्या आहेत. उमेश पाटील आपल्या राजीनाम्यावर ठाम

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी पक्ष सोडू नये, यासाठी वरिष्ठ पातळीवरून प्रयत्न केले. मात्र, उमेश पाटील आपल्या राजीनाम्यावर ठाम आहेत. महाविकास आघाडीतील पक्षाकडून त्यांना पक्षप्रवेशाचे निमंत्रण मिळाले असून ते शरद पवारांच्या (डहरीरव झरुरी) राष्ट्रवादीत जाणार की उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेची मशाल हाती घेणार, याची मोहोळच्या राजकारणात चर्चा रंगली आहे. मात्र, आज ते शरद पवारांच्या भेटीला आले आहेत, यामुळे ते पुन्हा शरद पवारांसोबत येणार असल्याच्या देखील चर्चा रंगल्या आहेत.

शरद पवारांच्या भेटीनंतर काय म्हणाले उमेश पाटील?

मोहोळची चर्चा आधीपासून आहे, मी जेव्हापासून सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात आहे, तेव्हापासून माझा तेथील हुकूमशाहीला आणि दडपशाहीला विरोध असल्याचे उमेश पाटील म्हणाले होते. तो विरोध पक्ष एकत्र असताना आणि शरद पवारांसोबत काम करत असताना पासूनचा आहे. तो नवीन नाही. त्या ठिकाणी असलेली परिस्थितीबाबत बोलण्यासाठी मी आज शरद पवारांच्या भेटीसाठी आलो आहे, असंही त्यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना सांगितलं. राजन पाटील जिथं असतात तोच आमदार निवडून येतो असं पक्षाला समज झाला असेल. पण आता काळ बदललंय, लोकांची भूमिका बदलली आहे. हे पक्षापर्यंत कसं पोहोचत नाहीये हे मलाही न समजणारे कोडे आहे. एका व्यक्तीला न्याय देण्यासाठी सर्वासामान्य लोकांवर अन्याय झाला असल्याचे उमेश पाटील म्हणाले होते.